# धर्मतुला

- - -

**भाग पहिला - हिंदु धर्म परीक्षण**
**भाग दुसरा - ख्रिस्ती धर्म निरीक्षण**

**सर्व गोष्टींची पारख करा, जें चांगलें तें बळकट धरा.**


हें पुस्तक

**हरि गोविंद केळकर**

यांनीं मराठींत तयार केलें.



(१८९४)

# प्रस्तावना

१ धर्मतुला हें पुस्तक मूळ हिंदी भाषेंत आहे. त्याच्या इंग्रजी भाषांतरासहित ‘मिझान उद्दीन या धर्मतुला’ नामक ‘रोमन उर्दू’ लिपींत छापून प्रसिद्ध केलेलें हिंदुस्थानी पुस्तक हें त्याची प्रतिकृति आहे. या दोन्ही पुस्तकांच्या आधारानें हें मराठी ‘धर्मतुला’ पुस्तक तयार केलें आहे. मूळ पुस्तकांतलीं कित्येक वाक्यें प्रतिकृतींत सोडिलेलीं आहेत. तसेंच प्रतिकृतींतलीं कित्येक वाक्यें मूळ पुस्तकांत आढळत नाहींत. तेव्हां अशा ठिकाणीं कोणतें वाक्य घ्यावें व कोणतें सोडावें याची मला स्वबुद्धीनें निवड करावी लागली. ती निवड, मराठी वाचकांच्या गरजेकडे लक्ष देऊन, म्यां[+] यथामति केली आहे. मूळ पुस्तकांत अगर त्याच्या प्रतिकृतींत नसलेले दोन परिछेद नवे जोडिले आहेत. टीपा पदरच्या घातल्या आहेत. विषयांचीं सदरें व अनुक्रमणिका स्वतां तयार करून घातलीं आहेत.

२ आपल्या या महाराष्ट्र देशांत तुकाराम, रामदास वगैरे कवींचीं वचनें साधारण लोकांस जशीं श्रुतिवचनप्राय होऊन बसलीं आहेत त्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानाकडे ज्या कित्येक कवींचीं वचनें श्रुतिवचनप्राय होऊन बसलीं आहेत अशा कित्येक कवींच्या त्रोटक कविता मूळ हिंदी पुस्तकांत आहेत. त्यांतील एक दोन कविता खेरीज करून बाकीच्या बहुतेकांचें या मराठी पुस्तकांत पद्य रूपानें भाषांतर करून घातलें आहे. सोडिलेल्या कवितांच्या ऐवजीं एक दोन संस्कृत पद्यें घातलीं आहेत. तसेंच पवित्र शास्त्रांतील जे भाग मूळ पुस्तकांत उतरून घेतलेले आहेत त्यांतील बहुतेक या मराठी पुस्तकांत गद्य रूपानें न लिहितां त्यांच्या कविता करून घातल्या आहेत. या पुस्तकांतल्या कविता ख्रिस्ती उपदेशकांना बऱ्याच उपयोगी पडतील व अशानें एकंदर पुस्तकांचा उपयोगीपणा वाढेल अशा आशेनें ही खटपट केली आहे.

३ ज्यांस विद्येचा फारसा संस्कार झालेला नाहीं अशा प्रतीच्या सत्य शोधक हिंदूस हिंदूधर्माचें स्वरूप दाखवून देण्यास व थोडक्यांत सुलभ रीतीनें खरा तारणारा प्रभु येशू ख्रीस्त याविषयींचें ज्ञान करून देण्यास साधन व्हावें या हेतूनें हें पुस्तक तयार केलें आहे. मूळ पुस्तककर्त्यानें व त्याची प्रतिकृति करणारानें तरी हें पुस्तक साधारण लोकांकरितांच लिहिलेलें आहे म्हणून या मराठी पुस्तकांत मुळांतल्या प्रमाणेंच विचारसरणी व भाषा हीं होतां होईल तितकें करून बालबोध करण्याचा प्रयत्न केला आहे.

४ हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं रे. ए. डव्ल्यू. पाऊच्छ, मेथडिस्ट मिशनरी, ठाणें, व रे. कासमभाई ढालवाणी, अमेरिकन मराठी मिशन, सातारा, यांजकडून जी मदत मिळाली त्याबद्दल भाषांतरकर्ता त्यांचा आभारी आहे.

५ पुस्तककर्त्याच्या अंगीं जी विद्वत्ता व जें भाषा ज्ञान असावें लागतें त्याचा माझ्या ठायीं बहुतेक अभाव आहे. तशांत हिंदी व हिंदुस्थानी भाषांचें माझ्या ठायीं अज्ञान. इंग्रजी भाषेशीं देखील माझा परिचय बेताचाच. मराठीचें तरी मार्मिक ज्ञान मला आहे असें नाहीं. तेव्हां या माझ्या कृतींत पुष्कळच व्यंगें असतील यांत तिळमात्र संशय नाहीं. तरी वाचकांनीं मला उदार बुद्धीनें वागवून घ्यावें अशी त्यांस विनंती आहे.

हरि गोविंद केळकर.

---

[+] ‘मी’ची तृतीया

# भाग पहिला - हिंदु धर्म परीक्षण

## १ देवाकडून मनुष्यास आलेला निरोप पवित्र शास्त्रांत आहे.

ज्या ग्रंथांत खऱ्या धर्माचीं म्हणजे ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्वें, सिद्धांत, इतिहास, वगैरेचें वर्णन केलेलें आहे त्या ग्रंथास होली बायबल म्हणजे पवित्र शास्त्र असें म्हणतात. तें शास्त्र ईश्वरानें आपल्या निवडलेल्या भक्तांकडून लिहविलें. त्या पवित्र पुस्तकांत लिहिलेल्या गोष्टी मी आतां तुम्हांस सांगणार आहे. त्यांत लिहिलें आहे कीं जगांतील सर्व लोक पापी आहेत व पापामुळें शिक्षेस पात्र झाले आहेत. त्याप्रमाणेंच असेंही लिहिलें आहे कीं पाप्यांस पापापासून सोडविण्याकरितां व पापाच्या अंधकारांतून काढण्याकरितां प्रभु येशू ख्रिस्त जगांत आला. व त्यानें अनेक प्रकारचीं दुःखें सोसून आपला प्राण दिला. व तीन दिवसपर्यंत तो कबरेंत राहिला. तरी तिसरे दिवशीं तो मेलेल्यांतून पुन्हां उठला. आणि नंतर वर आकाशांत चढून गेला. आणखी लिहिलें आहे कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो व त्याचा शिष्य होतो व त्यास आपला तारणारा असें मानितो तो ख्रिस्ताच्या पुण्याकडून व मध्यस्थीकडून पातकांची क्षमा व पूर्ण तारण पावतो. या गोष्टीविषयींचें मी आतां विस्तारें करून वर्णन करितो. चित्त देऊन ऐका.

## २ स्वभावतः सर्व मनुष्यें पापी आहेत.

सर्व मनुष्यजातीची स्थिति जन्म स्वभावें करून कशी आहे याचें पहिल्यानें वर्णन करितों. पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं प्रारंभीं ईश्वरानें एक मनुष्य व एक स्त्री, पवित्र व न्यायी अशी उत्पन्न केलीं. परंतु सैतानानें त्यांस फसवून पापांत पाडिलें. तेव्हांपासून त्यांची सर्व संतति म्हणजे सर्व मनुष्यजात पापिष्ट झाली. कारण जसें झाड तशा त्याच्या फांद्या होणार. जर मूळ कडू असेल तर फांद्याही कडूच होतील. याप्रमाणें जेव्हां आपले पहिले आईबाप पापी झाले तेव्हां पृथ्वींतले सर्व लोक त्यांचे वंशज असल्यामुळें तेही त्यांच्यासारिखेच पापी झाले आहेत.

**श्लोक**

**॥ जसा वृक्ष तैशीच शाखा त्याची ॥**
**॥ झऱ्यासारिखी सर्वदा धार तयाची ॥**
**॥ जशी सर्पिणी तैशीं बाळें तियेची ॥**
**॥ अगूणांतुनी गूण कैसा निघे ? ची ॥**

बरोबर आहे. ही गोष्ट खरी आहे कीं पृथ्वीच्या पाठीवरील एकंदर सर्व माणसें मोठी लहान, राव रंक, श्रीमंत दरिद्री, विद्वान अविद्वान, हिंदु युरोपियन, हे सर्व जन्म स्वभावें करून भ्रष्ट व पापी आहेत. मनुष्याच्या हिकमतीकडून व गर्वाकडून या देशांत निरनिराळ्या जाति स्थापिल्या गेल्या आहेत. कोणी ब्राह्मण, कोणी क्षत्रीय, कोणी वैश्य, व कोणी शूद्र झाले आहेत. परंतु परमेश्वराच्या दृष्टींत जात, मोठें नांव अगर पदवी यांची कांहीं मातबरी नाहीं. त्याच्या समोर सर्व मनुष्य एकाच जातीचीं आहेत, आणि तीं सर्व जन्मतः पापी आहेत.

## ३ ईश्वराच्या आज्ञा मोडणें हें पाप होय.

आपणां मनुष्यांस मार्ग दाखविण्याकरितां ईश्वरानें दाहा आज्ञा दिल्या आहेत. जे कोणी त्या आज्ञा मोडितात ते पापी होतात. त्या आज्ञांप्रमाणें पाप काय आहे हें मी सांगतों.

जो कोणी निराकार परमेश्वरास सोडून देव, देवी यांस मानून स्वतां आपण त्यांची पूजा करितो अगर दुसऱ्याकडून करवितो, जो कोणी स्वतां मूर्तीस नमन करितो अगर दुसऱ्याकडून करवितो, तो पाप करितो. जो कोणी परमेश्वराचें नांव व्यर्थ घेतो व त्याच्याकडे लक्ष नसतांही त्याच्या नांवाचा जप करितो अगर एखाद्या खोट्या गोष्टीचा खरेपणा स्थापित करण्याकरितां त्याचें नांव तोंडांत घेतो तो पापी आहे. जो कोणी आपले आईबाप व वडील यांचा सन्मान करीत नाहीं पण त्यांची अवगणना करितो तो पापी आहे. तुम्हांस ठाऊक आहे कीं पुष्कळ लोक आपल्या वृद्ध मातापितरांवर रागें भरतात, त्यांस शिवीगाळ देतात. कोणी कोणी तर त्यांस पोटभर खावयासही देत नाहींत. तीं जीवंत आहेत तेथपर्यंत त्यांस दुःख व त्रास देतात. परंतु जेव्हां तीं मरतात तेव्हां त्यांचें पिंडदान करण्याकरितां गयेस जातात. आणि मग आपल्या आईबापांचा सन्मान करूं लागतात.

### श्लोक

**॥ जिवंता पित्या संगतीं भांडताती ॥**
**॥ निमाल्यावरी प्रेत गंगेस नेती ॥**
**॥ जिवंता पित्याची पुसेनाति गोष्ट ॥**
**॥ मृता पीतया अर्पिती डाळभात ॥**

आतां मला सांगा कीं ही उलटीच गोष्ट आहे कीं नाहीं? जोंपर्यंत आईबाप जीवंत आहेत तोंपर्यंत त्यांची सेवा चाकरी केली पाहिजे आणि जेव्हां तीं मरण पावतात तेव्हां त्यांस परमेश्वराच्या हातांत सोंपून दिलें पाहिजे. परंतु सैतानानें त्यांच्या अंतःकरणांत अशी भुरळ घातली आहे कीं आईबाप जीवंत असतां त्यांचा मान सन्मान न केला तरी चिंता नाहीं कारण कीं ती मेल्यावर त्यांचें श्राद्ध घालितां येतें. आतां सांगा कीं कोणाची आज्ञा ऐकिली पाहिजे?

याप्रमाणेंच जर कोणी मनुष्य कोणा मनुष्यास ठार मारितो अगर कोणाचा मत्सर किंवा द्वेष करितो, कोणाचें वाईट व्हावें असें इच्छितो, अगर झगडे व लढाया माजवितो किंवा कोणास शिवीगाळ करितो किंवा कोणावर विनाकारण रागें भरितो किंवा कोणाची निंदा करितो, सारांश जेणेंकडून दुसऱ्याच्या शरीरास अगर मनास विनाकारण दुःख होतें असें कोणतेंही काम करितो तो पापी आहे. तुम्हांस ठाऊक आहे कीं पुष्कळ लोक द्वेषानें आपल्या वैऱ्याचा सत्यनाश व्हावा असें इच्छितात. आणि कोणी कोणी तर इतके दुष्ट व अधम असतात कीं आपल्या वैऱ्याचा नाश व्हावा म्हणून देवसकी करितात. अशा देवसकीस व अशा देवसकी करणाऱ्यास हायहाय, जे कोणी अशीं कामें करितात ते ईश्वराच्या दृष्टींत खुनी म्हणजे हत्या करणारे आहेत.

जे लोक परद्वार करितात अगर पुरुष संभोग करितात, जे दुसऱ्याच्या बायकोकडे काम दृष्टीनें पाहतात, आपल्या मनांत अशुद्ध व मलीन विचार बाळगितात, किंवा ज्याकडून ऐकणाऱ्यांच्या मनांत दुष्ट इच्छा उत्पन्न होईल अशा प्रकारचे विचकट व बीभत्स शब्द उच्चारितात, ते सर्व मोठे पातकी आहेत.

जे कोणी चोऱ्या करितात, कपटानें दुसऱ्यास ठकवितात, खोटीं वजनें वापरितात, माल देतांना दांडी मारितात, माल कमी देतात, माल भिजवून अगर त्यांत कशाची तरी भेसळ करून विकितात, एक नमुना दाखवून दुसऱ्याच प्रकारचा माल देतात, धन्यास फसविण्यासाठीं दुकानदाराशीं संगनमत करितात, अक्रीत* व्याज घेतात, लांच खातात अगर लांच देतात, सारांश लोकांपाशीं दगाबाजी अगर बेइमानी करितात, अशीं कामें करणारे सर्व लोक पापी आहेत.

जे कोणी खोटी साक्ष देतात अगर दुसऱ्याकडून देववितात, जे स्वतां खोटी शपथ वाहतात अगर दुसऱ्याकडून वाहवितात, जे स्वतां खोटें बोलतात अगर दुसऱ्याकडून बोलवितात, तसेंच देवानें आपणांस जें दिलें आहे तितक्यानें तृप्त न होतां जें दुसऱ्याच्या मालमत्तेवर लोभ ठेवितात ते सर्व पापी आहेत.

परमेश्वराच्या दाहा आज्ञांचा सारांश खालीं लिहिलेल्या दोन ओव्यांत आला आहे. त्या ओव्या ह्या आहेत. पहिलीः- 'तुझा देव प्रभु यावर तूं आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जीवानें व आपल्या सर्व शक्तीनें व आपल्या सर्व मनानें प्रीति कर.' दुसरीः- 'जशी आपणांवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर.' आतां विचार करा कीं जो कोणी खऱ्या अंतःकरणानें परमेश्वरावर प्रीति करितो त्यास सोडून मूर्तीची पूजा करील आणि खऱ्या व जीवंत परमेश्वराची भक्ति करणार नाहीं असें कधीं होईल काय? तो त्याचें नांव व्यर्थ कसें घेईल? तसेंच जो कोणी जशी आपणांवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति करितो तो आपल्या शेजाऱ्याचा द्वेष कसा करील? तसेंच दुसऱ्याचा घातपात कसा करील? किंवा दुसऱ्याच्या विरुद्ध खोटें कसें बोलेल? सारांश परमेश्वरावर प्रीति करणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि जोपर्यंत ही प्रीति तुमच्या अंतःकरणांत नाहीं, तोंपर्यंत जें कांहीं तुम्ही करितां तें सर्व पाप असें समजलें जाईल.

## ४ तुम्ही पाप केलें आहे कीं नाहीं.

आतां तुम्ही आपल्या अंतःकरणांत विचार करून निर्णय करा कीं आपण ईश्वराच्या आज्ञा उल्लंघिल्याकडून पाप केलें आहे कीं नाहीं. एका दिवसांतच तुम्ही किती पाप कर्म करितां, किती वाईट शब्द बोलतां, आणि किती वाईट विचार मनांत आणितां? तर मग तुम्ही आपल्या जन्मापासून आजपर्यंत जीं जीं पापें केलीं आहेत त्यांचा हिशोब केला तर तीं सगळीं मिळून किती गणती होईल? तुमचीं पापें व अपराध अगणित होतील यांत बिलकुल संशय नाहीं. आणखी असेंही समजा कीं हीं जीं सर्व प्रकारचीं पापें तुम्ही मनानें, वाचेनें, कायेनें केलीं आहेत तीं दुसऱ्या कोणास ठाऊक असोत कीं नसोत तीं सर्व परमेश्वरास ठाऊक आहेत कारण कीं तो सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे. त्यापासून कोणतीही गोष्ट लपली जात नाहीं. पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं, 'कोणी समजून देवाला शोधितो कीं नाहीं हें पाहावें म्हणून देवानें आकाशांतून मनुष्यांकडे पाहिलें. तेव्हां त्यास दिसून आलें कीं ते सर्व मागें सरले आहेत. झाडून घाणेरडे झाले आहेत. सुकर्मी कोणी नाहीं. एक देखील नाहीं. (गीत ५३ः२-३)'

तेव्हां त्यानें म्हटलें, आपला न्याय व पवित्रता ह्याप्रमाणें म्हटलें म्हणजे, त्यास शिक्षा दिली पाहिजे. पण परमेश्वर असा नीतिमान व न्यायी आहे तसाच तो दयाळू व कृपाळूही आहे. म्हणून जेव्हां त्यानें पाहिलें कीं

---

* बाजारभावापेक्षा जास्त

जगातले सर्व लोक पापी आहेत व शिक्षेस पात्र आहेत तेव्हां त्यानें आपल्या मोठ्या दयेनें ज्याकडून मनुष्यजात पापाबद्दलची शिक्षा व पापाची सत्ता यांपासून सुटका पावेल असा त्यांच्या तारणाचा एक उपाय योजिला.

## ५ ईश्वरानें योजिलेला तारणाचा उपाय.

आतां, पापक्षमा व तारण मिळण्याचा जो हा उपाय त्याविषयीं मी तुम्हांस सांगतों. चांगलें लक्ष लावून ऐका. परमेश्वराचा एकुलता एक पुत्र येशू ख्रीस्त आहे. तो आपल्या परम प्रीतीनें व करुणेनें आकाशाचें वैभव सोडून या जगांत आला. आणि त्यानें मनुष्याची प्रकृति व रूप हीं धारण केलीं. यासाठीं कीं परमेश्वरानें पाप्यांस जी शिक्षा ठरविली होती ती आपणांवर घ्यावी व अशा रीतीनें त्यांस तारणाची प्राप्ति करून द्यावी. जर तुम्ही प्रभू येशू ख्रीस्त कोण आहे हें समजण्याकरितां त्याचें चरित्र म्हणजे त्याची गोष्ट ऐकूं इच्छितां तर ती मी आतां तुम्हांस सांगतों.

फार प्राचीनकाळीं जेव्हां पाप जगांत आलें तेव्हां परमेश्वरानें आपल्या निवडलेल्या सेवकांकडून म्हणजे भविष्यवाद्यांकडून 'मी आपल्या पुत्रास, नेमिलेल्या वेळीं, जगाच्या तारणाकरितां पाठवीन' असें वचन पूर्वींच दिलें होतें यासाठीं कीं लोकांनीं त्याची वाट पहावी. 'जेव्हां काळाची पूर्णता झाली' तेव्हां येशूनें आकाशांतून उतरून येहूदा प्रांतात येऊन जन्म घेतला. तो मोठ्या डौलानें व थाटामाटानें आला नाहीं. तर गरीबीनें व नम्रतेनें या जगांत आला. कारण त्याची अशी इच्छा होती कीं जगांतल्या हीन दीन पापी लोकांनीं त्याच्या पुण्याच्या विपुलतेकडून धनवान व्हावें व तारण पावावें. राम, कृष्ण, महादेव इत्यादिकांप्रमाणें लीला क्रीडा करण्यास अगर लढाया युद्धें करण्यास अगर ठकबाजी करण्यास अगर कोणाचा नाश करण्यास अगर कोणाचा संहार करण्यास तो आला नाहीं. परंतु दीन पाप्यांचें तारण करण्याकरितां त्यानें अवतार घेतला. तो तुमच्या अवतारांप्रमाणें पाप्यांचा नाश करण्यासाठीं आला नाहीं. तर पापी लोकांच्या पापांचा नाश करून त्यांची पापापासून सुटका करण्याकरितां तो आला. तो स्वतां पापापासून अगदीं अलिप्त असे व नेहमीं सर्व प्रकारचीं चांगलीं कामें करीत व लोकांस तारणाविषयीं उपदेश करीत फिरत असे. शब्दमात्रेंकरून त्यानें अंधळ्यांस दृष्टि दिली, बहिऱ्यांस कान दिले. लंगड्यांस पाय दिले. थोट्यांस व लुळ्यांस हात दिले. सर्व प्रकारचें रोगी व दुःखी लोक त्याजकडे येत असत. व तो केवळ शब्द बोलण्याकडून त्यांस बरें करीत असे. कोडी लोक त्यांजकडे येऊन विनंती करीत कीं 'हे प्रभु आम्हांवर दया कर' आणि त्याच्या आज्ञेकडून त्यांचें कोड जात असे. भूतग्रस्त व दुष्ट आत्म्यांनीं पीडलेले यांस ही त्याजकडे आणीत असत व तो आज्ञा करण्याकडून भुतें घालवी व भूतग्रस्तांस मुक्त करी. एखाद्या झोपी गेलेल्यास आपण जागें करितों त्याप्रमाणें तो मेलेल्यांस जीवंत करीत असे. जे दुष्ट लोक त्यास दुर्भाषणें बोलत व त्याचा छळ करीत त्यांचेंही तो बरें करीत असे. त्यास कोणी अपशब्द बोलले तरी तो कोणास अपशब्द बोलत नसे. कोणी त्यास दुःख दिलें तर तें तो सोशी व त्या दुःख देणाऱ्यास धमकावीत नसे. या जगांतलें वैभव तुच्छ मानून तो म्हणत असे कीं 'मी सेवा करून घ्यावयास नाहीं तर सेवा करावयास व बहुतांची खंडणी व्हावी म्हणून आपला जीव द्यावयास आलों.' तसेंच प्रभु येशू ख्रीस्त कोणाच्या मोठेपणाकडे अगर पदवीकडे पाहून वागत नसे. मोठे लहान, उंच नीच, श्रीमंत दरिद्री, ज्ञानी अज्ञानी, वृद्ध तरुण, पुरुष स्त्री यांपैकीं जे कोणी आपली दुखणी बरीं करून घ्यावयास अगर तारणाचें वचन ऐकावयास त्यांजपाशीं येत त्यांस तो कधीं घालवीत नसे. तो सर्वज्ञ असल्यामुळें त्यांस सर्वांच्या अंतःकरणांची स्थिति कळत असे. म्हणून आपल्या खऱ्या अंतःकरणानें कोण येतो व ढोंगानें कोण येतो हें त्यास कळत असे. जेव्हां कोणी ढोंगी त्याजकडे येत तेव्हां ते कितीही विद्वान असले अगर मोठे पदवीवाले असले तरी तो त्यांची खरडपट्टी काढिल्यांवाचून रहात नसे. पण, जे कोणी शुद्ध भावानें त्याजकडे येत ते कितीही वाईट व कसेही पापी असले - मग ते पुरुष असोत अगर स्त्रिया असोत - तरी तो त्यांचें दुःख व पाप यांचा परिहार करीत असे. ते येशूकडे येत तेव्हां रोगी व दुःखी असे असत पण घरीं जात तेव्हां बरे

झालेले व आनंदी असे असत. जे कोणी आपल्या पापामुळें दुःखी होऊन रडत साहायार्थ येशूकडे येत ते आपल्या पापांची क्षमा पावून मोठ्या आनंदानें आपल्या घरीं परत जात.

## ६ येशू ख्रीस्ताच्या उपदेशाची कांहीं उदाहरणें.

प्रभु येशू ख्रीस्ताचा उपदेशही अशा प्रकारचा असें कीं तो ऐकून लोक आश्चर्यभरित होऊन म्हणत कीं 'ह्याचा उपदेश आमच्या शास्त्र्यांसारिखां नाहीं. पण अधिकार असल्यासारिखा हा उपदेश करितो.' मासल्याकरितां त्याच्या उपदेशांपैकीं कांहीं गोष्टी मी लिहितोंः-

एके ठिकाणीं त्यानें म्हटलें आहे कींः-

**श्लोक**

**आत्म्यानें जे गरिब जन ते धन्य, कीं राज्य त्यांचें ॥**
**आकाशाचें, वरितिल समाधान शोकार्त साचे ॥**
**पृथ्वी त्यांचें वतन सुमहाभाग जे नम्र होती ॥**
**न्यायत्वाची अतिशय तृषा भुक्ति त्या होत मुक्ति ॥**

**श्लोक**

**दयाशील ते धन्य कीं ईश्वराची ॥**
**दया त्यांवरी होतसे पूर्ण साची ॥**
**मना माजिं जे शुद्ध ते धन्य जाणा ॥**
**स्वयें ते पहातील कीं देव राणा ॥ १ ॥**

**श्लोक**

**शांती करीती जन धन्य जे क्षिती ॥**
**होतील ते देवकुमार निश्चिती ॥**
**न्यायीपणासाठींच ज्यांस गांजिती ॥**
**ते धन्य स्वर्गीं चिर राज्य पावती ॥**

दुसरे एके ठिकाणीं प्रभु येशू ख्रीस्तानें सांगितलें आहे कींः-

**ओव्या**

**प्रीति आपुल्या शेजाऱ्यावरी । करी वैऱ्याचा द्वेष परी ॥**
**सांगितलेंसें पूर्वीं यापरी । ऐकिलें तुम्ही आहेची ॥ १ ॥**
**परी मी सांगतों तुम्हांप्रती । करी वैऱ्यावरी प्रीति ॥**

तुम्हांलागी जे शापिती । आशीर्वाद त्यांस द्या ॥ २ ॥
द्वेष तुमचा जे करिती । त्यांचें बरें करा निश्चिती ॥
तुम्हां गांजिती पाठीस लागती । त्यांच्यासाठीं प्रार्थना करा ॥ ३ ॥
प्रीती धर्म पालन कराल । ऐशारीती वागाल ॥
तरी आपल्या आकाशांतील । बापाचे व्हाल पुत्र तुम्ही ॥ ४ ॥
कांकीं वाईटाचांगल्यावरी तो । आपल्या सूर्यास उगववितो ॥
न्यायीअन्यायीवरी पाडितो । पाऊस सारिखा सर्वदां ॥ ५ ॥

## ७ अंतःकरणाचा पालट झाला पाहिजे.

दुसरे एके प्रसंगीं ख्रीस्तानें सांगितलें आहे कीं:-

### आर्या

तुम्ही जर पालटूनी । लघुबाळां सारिखे न होणार ॥
तरि कधिं प्रवेश तुमचा । नाहीं आकाश राज्यीं होणार ॥

ह्याचा भावार्थ असा आहे कीं जर तुम्ही आपलें नांव, जात, कुळ, सत्कृत्यें यांविषयींचा अभिमान वाहणें सोडून लहान लेकरांसारिखें गरीबीनें व नम्रतेनें परमेश्वराचें म्हणणें मान्य करणार नाहीं तर तुम्हांस कधींही तारण प्राप्ती होणार नाहीं.

एक पंडित तारणाच्या मार्गाचा शोध करीत प्रभु येशू ख्रीस्तापाशीं आला. तेव्हां प्रभूनें सांगितलें कीं:-

### ओव्या

मी खचित सांगतों तुज लागून । पुन्हां जन्मलिया वांचून ॥
कोणाच्यानेंही देव राज्य जाण । पहावत नाहीं कधींही ॥ १ ॥
जें जन्मलें देहापासून । तें आहे देह जाण ॥
जें जन्मलें आत्म्यापासून । आत्मा तेंची असे कीं ॥ २ ॥

त्याच पंडितास ख्रीस्तानें असेंही म्हटलें कीं:-

### श्लोक

देवानें इतकी जगावरि पहा केली प्रीती पुष्कळ ॥
कीं जो एकुलता स्वपुत्र अपुला तो दीधला सोज्वळ ॥
जो कोणी जन त्या सुतावरि खरा विश्वास ठेवील हो ॥
व्हावी तारण प्राप्ति नाश न कधीं व्हावा तयाचा अहो ॥

**ओवी**

**जग अन्यायी ठरविण्यासाठीं। देवें न धाडिलें स्वपुत्रा जगतीं॥**
**परी त्या व्हावी तारण प्राप्ति। तद्वारें म्हणोनि पाठविलें॥**

प्रभू येशू ख्रीस्ताच्या उपदेश मालेंतून या दोन चार गोष्टी मासल्यादाखल मीं सांगितल्या आहेत. आणखी पहाण्याची जर तुमची इच्छा असेल तर पवित्र शास्त्रांतील उत्तर भाग ज्यास नवा करार म्हणतात व ज्यांत प्रभु येशू ख्रीस्तांचें चरित्र म्हणजे गोष्ट आहे तो वाचून पहा. तो तुम्हांस मिशनरीपाशीं मिळेल.

## ८ पाप्यांकरितां प्राण अर्पण करून येशू ख्रीस्तानें आपलें सामर्थ्य वगैरे कसें दाखविलें.

अशा प्रकारचीं प्रीतीचीं व दयेचीं कामें करून व खऱ्या धर्म सिद्धान्ताचा उपदेश करून प्रभु येशू ख्रीस्तानें आपलें गौरव व सामर्थ्य हीं जगास प्रसिद्ध (प्रकट) केलीं. शिवाय तो वारंवार आपल्या शिष्यांस सांगत असे कीं असा दिवस येईल कीं त्या दिवशीं माझे शत्रू मला धरितील व खांबावर खिळून मारितील. पण तीन दिवसांनंतर मी मेलेल्यांतून पुन्हां उठेन. तसेंच जर मला वाटेल तर मी आपल्या शरीराचें रक्षण करूं शकेन पण तशानें जगाचें तारण कसें होईल? आपल्या लोकांचें तारण व्हावें म्हणून मी त्यांचा बदला (जामीन) होऊन त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा मीं आपणांवर घेतली आहे. आणि मी स्वखुषीनें आपल्या जीवाचें पापार्पण करणार आहें. प्रभुनें पूर्वीं सांगितल्या प्रमाणेंच सर्व गोष्टी घडून आल्या. दुष्ट लोकांनीं त्यास धरिलें व कोणत्या तरी रीतीनें त्यास मारावें असा मनसोबा केला. पण त्याच्या ठिकाणीं कांहीं एक दोष दिसून आला नाहीं. तेव्हां बनावट साक्षीदारांच्या मदतीनें त्यास अपराधी व दंडपात्र ठरविलें तेव्हां त्यास फटके मारिले व त्याच्यावर नानाप्रकारची जुलूम जबरदस्ती केली. तरी प्रभु येशू ख्रीस्तानें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. नंतर त्यांनीं एक मोठा क्रूस म्हणजे एक उंच लाकडाशीं दुसरें लाकूड आडवें बांधिलेलें असतें तो जमिनींत पुरून उभा केला. आणि प्रभु येशू ख्रीस्तास त्यावर चढवून त्याच्या हातापायांत खिळे ठोकिले. अशा यातनांत रक्त पाडीत असतां, सुमारें साहा तासपर्यंत तो क्रूसावर राहिला. त्यास जे दुःख देणारे होते ते त्यांस हांसत व त्याची थट्टा करीत होते. तरी प्रभु येशू ख्रीस्तानें तशा प्रकारच्या वेदना व दुःख भोगीत असतां ही त्यांच्यासाठीं प्रार्थना केली कीं ‘हे बापा त्यांची क्षमा कर, कारण कीं ते काय करितात हें त्यांस समजत नाहीं.’ नंतर दुपार झाल्यावर एकाएकीं अंधार पडला व सुमारें तीन तासपर्यंत तसाच अंधार होता. तेव्हां प्रभूनें ओरडून म्हटलें ‘पूर्ण झालें. हे बापा मी आपला आत्मा तुझ्या हातांत सोंपून देतो.’ आणि असें बोलून त्यानें प्राण सोडिला. त्याच्या मरणसमयीं भूमीकंप झाला, खडक फुटले, थडीं उघडलीं. झोपीं गेलेले पवित्र लोक यांतील बहुतांचीं शरीरें उठलीं व ते पुष्कळांच्या दृष्टीस पडले.

नंतर दोन मोठे पदवीवाले असामी जे प्रभूचे शिष्य होते त्यांनीं बेधडक त्या प्रांतांच्या सुभेदाराकडे जाऊन प्रभूचें शरीर मागितलें. त्यांनीं ख्रीस्ताच्या हातांपायांतले खिळे काढून टाकिले. त्याचें शरीर क्रूसावरून खालीं उतरिलें. व तें तागाच्या स्वच्छ वस्त्रांत गुंडाळून खडकांत खोदलेल्या एका कबरेंत ठेविलें. नंतर त्याच्या शत्रूंनीं त्या कबरेच्या तोंडावर एक मोठी धोंड ठेवून कबरीची रखवाली करण्याकरितां शिपायांचा पहारा बसविला.

## ९ ख्रीस्ताचें मेलेल्यांतून पुन्हां उठणें व आकाशांत चढून जाणें.

तीन दिवसपर्यंत प्रभू येशू ख्रीस्त कबरेंत राहिला. मग तिसरें दिवशीं आदितवारीं काय झालें म्हणाल तर सकाळीं मोठ्या पहांटेस मोठा भूमीकंप झाला. व एका देवदूतानें आकाशांतून उतरून, कबरेच्या तोंडावर जी धोंड बसविलेली होती ती एकीकडे सारिली. आणि प्रभु येशू ख्रीस्त उठून तींतून जीवंत बाहेर आला. नंतर चाळीस दिवसपर्यंत वारंवार त्यानें आपल्या शिष्यांस दर्शनें दिलीं व त्यांच्याशीं तो बोलला. नंतर एके दिवशीं एके ठिकाणीं जमवून त्यानें त्यांस आज्ञा केली कीं 'आकाशांत व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे. यास्तव तुम्ही जाऊन सर्व देशांतील लोकांस शिष्य करा. त्यांस बापाच्या, पुत्राच्या, पवित्र आत्म्याच्या नांवानें बाप्तिस्मा द्या. म्यां[+] ज्या आज्ञा तुम्हांस दिल्या त्या सर्व पाळावयास त्यांस शिकवा.' याप्रमाणें बोलून आपल्या शिष्यांस आशीर्वाद देत असतां, त्यांच्या देखत तो आकाशांत आपल्या बापाकडे चढून गेला.

## १० मनुष्यजातीचें पाप हरण करण्याकरितां येशू ख्रीस्तानें दुःख सोशिलें.

पहा मित्रांनो ह्याप्रमाणें येशू ख्रीस्ताची थोडक्यांत हकीकत आहे. तुम्ही आतां हिच्याविषयीं विचार करा. व तिला आपल्या अंतःकरणांत जागा द्या. जर तुम्ही विचाराल कीं अशा चांगल्या व न्यायी मनुष्यानें इतकें दुःख व इतके क्लेश कां सोशिले? तर ह्याचें उत्तर असें आहे कीं त्यानें जगांतील लोकांच्या पापाबद्दलची शिक्षा आपणावर घेऊन इतकें दुःख सोशिलें व अशा करण्याकडून परमेश्वराचा न्याय पूर्ण करून दिला. एक दाखला ऐका. कोणी एका मनुष्यानें एका सावकारापासून एक हजार रुपये कर्जाऊ काढिले. जेव्हां मुदत खलास झाली तेव्हां सावकारानें आपले रुपये मागितले. त्या बिचाऱ्या गरीब कर्जदारापाशीं देण्यास कांहीं नव्हतें. पण सावकार तर त्यास कांहीं केल्यानें सोडीना कारण त्यास ठाऊक होतें कीं हजार रुपये मुद्दल व त्यांचें व्याज घेणें त्याचा हक्कच होता. अशा अडचणींत कर्जदाराचा कोणी एका श्रीमंत मित्र त्या सावकाराकडे जाऊन म्हणाला, 'त्या गरीबाकडे येणें असलेले तुमचे रुपये व्याजासुद्धां मी आपल्या पदरच्या पैशांतून भरून देतो.' सावकारानें मोठ्या खुषीनें आपल्या रुपयांची भरपाई करून घेतली. व कर्जदारास फारखत[*] लिहून दिली. याप्रमाणें त्या मनुष्याचें कर्ज, त्याच्या त्या श्रीमंत मित्राच्या मेहरबानीनें फिटलें जाऊन त्यास त्या कर्जाबद्दल जी शिक्षा झाली असती ती चुकली. तेव्हां तो कर्जदार आनंदित झाला नसेल काय? निःसंशय त्यास फारच आनंद झाला असेल. कारण त्यास ठाऊक होतें कीं आपल्या डोईवर जें कर्ज होतें तें आपल्याच्यानें फिटलें नसतें. पण आपल्या कृपाळू मित्रानें आपणाबद्दल तें भरून दिलें व आपल्या डोईवरचा भार उतरिला. जर कोणी दयाळू मनुष्य आपल्या मित्राशीं या प्रकारची वागणूक करील तर तो मनुष्य त्या आपल्या मित्राचा आभारी होणार नाहीं काय? व त्यावर प्रीति करणार नाहीं काय?

पहा याप्रमाणें मी, तुम्ही व सर्व लोक पापामुळें परमेश्वराचे कर्जदार झालेले आहों. आणि तुमचीं सर्व धर्मकृत्यें व पुण्य कृत्यें हीं तें ओझें दूर करावयास अगदीं निरुपयोगी व असमर्थ आहेत. जर तुम्ही अशा विपन्न स्थितींत रहाल तर निराश व लज्जित होऊन अवश्य नरकांत जाल. कारण कीं परमेश्वर खरा, न्यायी व पापाबद्दल शिक्षा देणारा आहे. तो आपला न्याय कधींही सोडणार नाहीं पण पाप्यांस अवश्य शिक्षा करील. आतां ऐका.

---

[+] 'मी'ची तृतीया

[*] कर्जफेडीची चिठ्ठी

परमेश्वराचा एकुलता एक पुत्र प्रभु येशू ख्रीस्त हा माझा व तुमचा एक खरोखर मित्र आहे. त्याची ममता व प्रीति हीं अपार आहेत. तशीच त्याची दया व कृपा हीं अपरंपार आहेत. पाप्यांवर जी शिक्षा यावयाची होती ती त्यानें आपणावर घेतली व पाप्यांच्या कर्जाचें ओझें आपणा स्वतांवर घेऊन तें भरून दिलें व परमेश्वरास संतुष्ट केलें. त्यानें मोठीं दुःखें सोसून आपल्या जीवाचें अर्पण केलें. व परमेश्वराचा न्याय पूर्ण करून देऊन त्यानें आपणा मनुष्यासाठीं पापांची क्षमा व सार्वकालिक जीवन हीं सिद्ध केलीं आहेत. तर ही गोष्ट ऐकून तुम्ही आनंद व उल्हास करावा व पापांची क्षमा व तारण ह्या गोष्टी ख्रीस्ताकडून घेऊन त्याजवर प्रीति करावी हें तुम्हांस उचित आहे.

## ११ परमेश्वराची पाप्यांवर विलक्षण प्रीति.

पहा परमेश्वराची प्रीति केवढी मोठी आहे! परमेश्वरानें तुम्हांवर प्रीति करावी असें कोणतेंही सत्कर्म तुम्हीं केलेलें नाहीं अगर कांहीं पुण्य जोडिलेलें नाहीं. पण उलटें तुम्ही आपल्या जन्मापासून काया वाचा मनें करून पाप करीत आला आहां आणि आतां देखील प्रत्येक दिवशीं पाप करितां व परमेश्वराच्या आज्ञा मोडितां. तरी देखील तो तुमच्यावर दया करीत आहे. जर एखाद्या भिकाऱ्यास मेहरबानीनें तुम्ही प्रत्येक दिवशीं अन्नवस्त्र देतां व अनेक प्रकारें त्याचें बरें करितां आणि तोच जर तुमचा द्वेष करील अगर तुमची कांहीं चोरी करील अगर तुम्हांस शिवीगाळ करील अगर दुसऱ्या कोणत्या तऱ्हेनें तुमचें वाईट करील तर त्या अधमावर तुम्ही प्रीति कराल काय? तुम्ही त्यावर प्रीति तर करणार नाहींच पण उलटें त्या कृतघ्नास हांकलून लावाल व त्यास आपल्यासमोर येऊं देखील देणार नाहीं. आतां पहा माझी व तुमची स्थिति थेट या भिकाऱ्याच्या स्थितीसारखीच आहे. परमेश्वर तुम्हांवर दया करून रोज रोज तुम्हांस अन्नवस्त्र, मुलेंबाळें, व दुसरीं नानाप्रकारचीं सुखें देत आहे. आणि तुम्ही तर त्यास अडवितां व त्याचा द्वेष करितां. परमेश्वरास अडविणें अगर त्याचा द्वेष करणें हें आहे कीं तुम्ही त्याच्यावर प्रीति करीत नाहीं. त्यानें ज्या गोष्टी मना केल्या आहेत त्या तुम्ही करितां व ज्या गोष्टी त्यानें करावयास सांगितल्या आहेत त्या तुम्ही करीत नाहीं. त्याची आज्ञा आहे कीं केवळ एका निराकार परमेश्वराची भक्ति करावी. देव, देवी, व मूर्ति यांची पूजा करूं नये पण तुम्ही त्यांची पूजा करितां व परमेश्वराची भक्ति मुळींच करीत नाहीं. त्याची आज्ञा आहे कीं चोरी करूं नये, कोणास फसवूं नये. कोणास शिवीगाळ करूं नये, खोटें बोलूं नये, शिंदळकीं व्यभिचार करूं नये. गर्व करूं नये. आपलाच स्वार्थ पाहूं नये. अशा आणखी पुष्कळ आज्ञा त्यानें दिल्या आहेत. त्या सर्व तुम्हांस ठाऊक आहेत. पण तुम्ही खऱ्या अंतःकरणानें त्यांपैकीं एक देखील आज्ञा पाळीत नाहीं. पण उलटें रात्रंदिवस त्यांचें उल्लंघन करितां. हें देवाला अडविणें व त्याचा द्वेष करणें नाहीं काय? तुम्ही नेहमीं सर्व गोष्टींत देवाला अडवितां व त्याचा द्वेष करितां यांत बिलकूल संशय नाहीं. परमेश्वर आमचा द्वेष करितो असें तर कोणी म्हणूं शकणार नाहीं. कारण त्याची प्रीति अनेक रीतींनीं दिसून येत आहे. तो सर्व जगावर प्रीति करतो. त्यानें जगावर मोठी प्रीति करून आपल्या एकुलत्या एक पुत्रास या जगांत पाठविलें. यासाठीं कीं पाप्यांस त्यांच्या पापापासून व नरकयातनेपासून सोडविण्याकरितां बहुत कष्ट व दुःखें सोसून त्यानें आपला जीव द्यावा व पाप्यांच्या पापाचें प्रायःश्चित्त करावें व त्यांचे तारण करावें. परमेश्वराच्या अशा प्रकारच्या प्रीतीच्या चिंतनाकडून तुमचीं कठीण अंतःकरणें मऊ होत नाहींत काय? जर अशा प्रकारच्या प्रीतीच्या ज्वालांकडून हीं तुमचीं अंतःकरणें मऊ होत नाहींत तर तीं कशाकडून होतील हें मला समजत नाहीं. जर अशा गोष्टींनीं तीं मऊ होत नाहींत तर दुसऱ्या कशानें होतील? जर तुम्ही देवाची प्रीति तुच्छ मानितां तर देवानें तुम्हांवर क्रोध करून घोर नरकांत टाकिलें असतां तें वाजवी होणार नाहीं काय ? खरोखर जर तुम्ही देवाच्या प्रीतीस आपल्या अंतःकरणांत जागा देणार नाहीं तर तो अवश्य असें करीलही.

## १२ येशू ख्रीस्ताची पाप्यांवर विलक्षण प्रीति.

तसेंच प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रीतिविषयींही विचार करा. जेव्हां परमेश्वरानें पाहिलें कीं जगांतले सर्व लोक पापामुळें भ्रष्ट झालेले आहेत व आपल्या आज्ञांप्रमाणें कोणी चालत नाहींत व आपली भक्ति करणें सोडून लोक आपल्या स्वतांच्या हातांनीं केलेल्या जड पदार्थांची पूजा करितात, तेव्हां आपला न्याय व नेकी यांस अनुसरून तो त्यांस शिक्षा देण्यास सिद्ध होता. आतां ह्या गोष्टींत प्रभु येशू ख्रीस्ताची प्रीति पहा. जेव्हां त्यानें पाहिलें कीं जगांतले लोक शिक्षेस पात्र झालेले आहेत तेव्हां मध्यस्थ होऊन देव जो बाप त्यास त्यानें म्हटलें कीं 'बापा जगांतील लोकांनीं खरोखर पुष्कळ पापें केलीं आहेत व ते कडक शिक्षेस पात्र झाले आहेत. पण मजकडे पहा. मी त्यांचा जामीन होतो. मी जगांत जातो व मनुष्याची प्रकृति धारण करून त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा आपणांवर घेतो. आणि मोठें दुःख व कष्ट सोसून व त्यांच्याबद्दल आपला जीव देऊन त्यांची खंडणी करितो. अशानें तुझा न्याय व नेकी हीं दोन्हींही पुरीं होतील. कारण कीं त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा मजवर येईल. तसेंच तेणेंकरून तुझी दया व कृपा हींही स्पष्ट दिसून येतील. कारण कीं माझ्याद्वारें तूं त्यांची क्षमा व त्यांचें तारण करूं शकशील. मीं अशीं मोठीं दुःखें सोसल्याकडून व त्यांच्यासाठीं आपला जीव देण्याकडून मला जें पुण्य प्राप्त होईल त्याचें फल मी त्यांस देईन. माझ्या प्रायःश्चित्ताकडून स्वतां मला जो न्यायीपणाचा झगा प्राप्त होईल तो मी त्यांच्यावर घालीन. तेणेंकरून त्यांचा नागवेपणा झांकला जाऊन त्यांचे अपराध व त्यांचीं पापें तुझ्या दृष्टीस पडणार नाहींत. कारण कीं माझ्या पवित्रतेच्या व न्यायीपणाच्या झग्याकडून त्यांचे सर्व डाग व ठिपके झांकून टाकिले जातील. या रीतीनें ते तुझ्या दृष्टींत मान्य होतील. व माझ्यामुळें तूं त्यांस न्यायी असें लेखून आकाशांत घेऊं शकशील.'

प्रभु येशू ख्रीस्ताची ही गोष्ट देव जो बाप त्याच्या पसंतीस येऊन त्यानें म्हटलें, 'तूं माझा प्रिय पुत्र आहेस. तुझ्याविषयीं मी संतुष्ट आहें. त्वां[+] माझ्या मनांतलीच गोष्ट सांगितली. तूं जगांत जाऊन मनुष्याची प्रकृति धारण करून त्वां[+] म्हटल्याप्रमाणें पाप्यांचा तारणारा हो. जा व आपल्या पवित्रतेनें व न्यायीपणानें त्यांच्या पापाबद्दल क्षमा व त्याची खंडणी हीं साध्य करून घे. जो कोणी तुझ्या पुण्यावर व न्यायीपणावर आपल्या तारणाचा भरंवसा ठेवील त्यास तारण मिळेल.'

पहा, प्रभु येशू ख्रीस्त अवतार धारण करून या जगांत आला. तो आकाशांत होता तेव्हां सुखांत व गौरवांत होता. पण त्यानें पाप्यांसाठीं स्वर्ग सोडिला व या जगांत येऊन गरीब व अप्रतिष्ठित असा झाला. व सर्व प्रकारचीं दुःखें व क्लेश सोसून आपला जीव अर्पण केला. ही मोठी विलक्षण प्रीति नाहीं काय? पहा तो स्वतः पवित्र व निर्दोष असतां त्यानें इतकीं दुःखें व वेदना सोशिल्या व लोकांचा द्वेष व वैर हीं सहन केलीं. निंदा करणाऱ्यांची त्यानें त्यानें उलटून निंदा केली नाहीं. तो निर्दोष होता तरी त्यानें मार खाल्ला. तो चेंचरला[*] गेला. त्याच्या मस्तकांत मोठमोठे कांटे टोंचिले गेले. त्याच्या पाठीवर चाबुकांचे फटके बसले. त्याच्या हातांत व पायांत मोठमोठे खिळे ठोकिले. त्याचें शरीर रक्तबंबाळ झालें. त्याची प्रत्येक नाडी व शीर दुखावली गेली. शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें प्राण सोडिला. प्रभु येशू ख्रीस्तानें हें सर्व तुमच्या तारणाकरितां सोशिलें. तर हें मोठ्या अमर्याद प्रीतीचें लक्षण आहे कीं नाहीं हें सांगा.

---

[+] 'तू'ची तृतीया

[*] चेंचरणे - चिरडणे, ठोकणे, मारणे

## १३ येशू पवित्र व निष्पाप होता.

आणखी या गोष्टींचा नीट विचार करा कीं प्रभु येशू हा पवित्र व निष्पाप आहे. त्याच्या ठायीं पापाचा लेशही नाहीं. तर त्यानें जें दुःख व जे क्लेश सोशिलें तें सर्व दुसऱ्यांच्या बऱ्यासाठीं म्हणजे तुझ्या व माझ्या बऱ्यासाठीं होतें. तुम्हीं व मीं पाप केलें आहे. आपण पापामुळें परमेश्वराच्या क्रोधास पात्र झालों आहों. आपणांबद्दल व सर्व जगाबद्दल प्रभुनें हीं सर्व दुःखें व हे सर्व क्लेश सोशिले. मी पुन्हां विचारितों हीं मोठी विलक्षण प्रीति आहे कीं नाहीं? तिच्या चिंतनाकडून तुमची कठीण अंतःकरणें मऊ होत नाहींत काय? प्रीतिपासून प्रीति उत्पन्न होते. प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रीतिकडून तुमच्या अंतःकरणांत प्रीति उत्पन्न होणार नाहीं काय? तुमचीं अंतःकरणें इतकीं सुनबहिरीं झालीं आहेत काय कीं त्यांवर प्रीतीच्या गोष्टींचा कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं? किंवा ती अशी नापीक जमीन झाली आहे कीं तींत प्रीतीचें रोप उगवूं शकत नाहीं? अहो मित्रांनो तुम्हीं आपलीं अंतःकरणें किती काळपर्यंत कठीण कराल? तुमची स्थिति जर अशीच राहील तर पक्कें समजा कीं परमेश्वराचा क्रोध भडकून थोड्याच दिवसांत तुम्हांस गिळून टाकील.

## १४ येशू सर्व जगाचा तारणारा आहे<br>ही मनुष्यांस मोठ्या आनंदाची वार्ता आहे.

तुम्ही खरोखर समजा कीं परम श्रेष्ठ परमेश्वरानें प्रभु येशू ख्रीस्तास एखाद्या आवडत्या राष्ट्राचा किंवा देशाचा तारणारा नेमिलें आहे असें नाहीं. तर सर्व जगाचा तारणारा नेमिलें आहे. म्हणून प्रभूनें आकाशांत चढून जाण्याच्या वेळीं आपल्या शिष्यांस आज्ञा केली कीं, 'सर्व जगांत जाऊन तारणाचें शुभवर्तमान सांगा.' त्याच्या आज्ञेस अनुसरून त्याचे प्रेषित देशोदेशीं फिरले. बहुत लोकांनीं त्यांचा उपदेश ऐकून आपला खोटा धर्म सोडून दिला व प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेऊन ते त्याचे शिष्य झाले. त्या दिवसापासून आजपर्यंत या जगांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार होत आला आहे व अजूनही तो तसाच फैलावत आहे. या हिंदुस्थान देशांत ही देवाच्या मोठ्या कृपेनें मिशनरी लोक व त्यांचे अनुयायी ख्रीस्ती धर्माचा उपदेश करीत आहेत.

तसेंच मीही या लहानशा पुस्तकाच्याद्वारें तुम्हांस - जे कोणी हें पुस्तक वाचितील अगर ऐकतील त्यांस - तारणाचें शुभवर्तमान घोषण करीत आहे. मित्राच्या नात्यानें मी तुम्हांस सांगतों कीं, प्रभु येशू ख्रीस्त तुम्हां हिंदुलोकांचाही तारणारा आहे. त्याच्याशिवाय दुसरा तारणारा नाहीं. पाप्यांस जशा तारणाऱ्याची गरज आहे तशाच प्रकारचा तो आहे. तो पवित्र आहे. त्याच्याठायीं पापाचा लेशही नाहीं. तो सर्वशक्तिमान दयाळु व कृपाळु आहे. तो पापाचा शत्रू आहे पण पाप्यांचा मित्र आहे. सारांश जे जे गुण जगाच्या तारणाऱ्याच्या ठायीं असले पाहिजेत ते सर्व प्रभु येशू ख्रीस्ताच्या ठायीं आहेत. तो परमेश्वराचा खरा अवतार व जगाचा खरा गुरु आहे. जो कोणी शुद्ध अंतःकरणानें त्यास शरण येतो त्या प्रत्येकास तो तारणाचें ज्ञान व तारण हीं अवश्य देतों.

**दोहा**

**सत्यगुरू माझा शूर। करी शब्दांचा व्रण॥**<br>**मारी गोळा प्रेमाचा। भ्रम कोट उडवी क्षण॥ १॥**

आतां तुम्हांस या गोष्टीचा काळजी पूर्वक विचार केला पाहिजे कीं काय केल्यानें आपणांस हें मोलवान तारण मिळेल. पवित्र शास्त्रांत प्रभु येशू ख्रीस्तानें असें सांगितल्याचें लिहिलें आहे कीं जो कोणी त्यावर विश्वास ठेवील व बाप्तिस्मा घेईल त्याचें तारण होईल. पण जो कोणी विश्वास ठेवणार नाहीं त्यास शिक्षा देण्यांत येईल व त्यास नरकांत टाकिलें जाईल.

## १५ माझें तारण कसें होईल?

यावरून दिसून येतें कीं तारण मिळावें म्हणून तुम्हांस दोन गोष्टी केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही आहे कीं प्रभु येशू ख्रीस्तावर आपल्या तारणाचा विश्वास ठेवावा. दुसरी गोष्ट अशी आहे कीं बाप्तिस्मा घ्यावा.

प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवणें याचा अर्थ असा आहे कीं तुम्ही जर आपल्या पापाबद्दल खरे पश्चात्तापी होऊन तारण प्राप्त करून घेऊं इच्छितां तर आपल्या खोट्या धर्माचा त्याग करून आपलें पुण्य व आपलीं सत्कर्मे यांवरचा भरंवसा सोडून देऊन केवळ प्रभु येशू ख्रीस्तावर आपल्या तारणाचा भरंवसा ठेवावा आणि मनांत विश्वास धरावा कीं त्यानें जें पुण्य व जो न्यायीपणा मिळविला आहे त्यांकडून आमच्या पापांचें प्रायश्चित्त झालें आहे. तो आपला धनी, आपला गुरू, आपला राजा व आपला तारणारा आहे. तर आपण खऱ्या मनानें त्यास शरण जाऊन त्याचें शिष्य व्हावें.

## १६ बाप्तिस्मा म्हणजे काय?

तसेंच बाप्तिस्मा घेण्याचें कारण असें आहे. जेव्हां तुम्ही खऱ्या अंतःकरणानें प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून त्याचे शिष्य होऊं इच्छितां तेव्हां तुम्ही आपल्या अंतःकरणांतील विश्वास मनुष्यांसमोर अंगीकार करून प्रकट करून दाखवावा याचें अगत्य आहे. कदाचित् कोणी म्हणेल कीं दुसऱ्या कोणांस ठाऊक असो कीं नसो मी आपल्या अंतःकरणांत प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवितों. मग तो लोकांस कळविण्याची काय जरूरी आहे? याचें उत्तर असें आहे कीं अशा प्रकारचा विश्वास हा खरा विश्वास नव्हे. प्रभुनें बाप्तिस्मा एक संस्कार नेमिला आहे. तो संस्कार करून नव्या शिष्यास ख्रिस्ती मंडळींत घेतात. तो संस्कार शिष्यत्वाचा शिक्का असा आहे. त्या संस्काराचें वर्णन करण्याचें या ठिकाणीं प्रयोजन नाहीं. तो संस्कार घेतल्याकडून नवा शिष्य लोकांसमोर उघड कबूल करितों कीं मी आपला पूर्वींचा खोटा धर्म सोडून देतो, व प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याच्या धर्मांत येतों व त्याचा शिष्य होतो. मग तो संस्कार करण्याकडून तो ख्रिस्ती मंडळींत घेतला जातो.

## १७ परमेश्वर प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या अंतःकरणांत आपला पवित्र आत्मा पाठवितो.

तसेंच हेंही समजलें पाहिजे कीं परमेश्वर प्रत्येक खऱ्या ख्रिस्ती मनुष्याच्या अंतःकरणांत आपला पवित्र आत्मा पाठवितो व तो आत्मा त्यांच्या अंतःकरणांत वस्ती करितो. त्या आत्म्याच्या शिक्षणाकडून व काम करण्याकडून शिष्य प्रति दिवशीं देवाच्या ज्ञानांत व प्रीतींत वृद्धि पावत जातो आणि पापाचा द्वेष करून प्रत्येक चांगल्या कामांत वाढत जातो.

## १८ मी ख्रिस्ती झालों तर माझे जातभाऊ मला जाती बाहेर टाकितील.

या गोष्टी वाचून अगर ऐकून कदाचित् तुम्ही म्हणाल कीं जर आम्ही आपला हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूं तर आमच्या जातीचे लोक व भाऊबंद यांस सोडावें लागेल. कारण ते आम्हांस खचित जाती बाहेर टाकितील व आमचा द्वेष करितील. पण माझ्या मित्रांनो जर तुम्ही आपल्या आत्म्याचें तारण होऊं इच्छितां तर तुमचे भाऊबंद व जातीचे लोक काय म्हणतील अगर काय करितील याची पर्वा करूं नका. पण असा पक्का निश्चय करा कीं भाऊबंद कांहीं म्हणोत अगर कांहीं करोत आम्ही आपल्या आत्म्याच्या उद्धारासाठीं व स्वर्ग प्राप्तीसाठीं ख्रिस्ताचे शिष्य अवश्य होऊं. तुम्ही पक्कें जाणतां कीं तुम्ही कितीही खोटें बोलला, शिव्या गाळी केल्या, चोरी केली, व्यभिचार केला अगर दुसरें कोणतेंही वाईट काम केलें तरी तुम्हांस कोणी जाती बाहेर टाकणार नाहीं. कारण कीं सर्व प्रकारचे दुराचारी व दुष्ट लोक तुमच्या जातींत राहूं शकतात. पण तुम्ही आपल्या तारणासाठीं व परलोकींच्या सुखासाठीं खोटेपण व दुष्टाई सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूं पाहतां तर लोक तुम्हांस जाती बाहेर टाकितात. अशा प्रकारच्या जातीस व भाऊबंदपणास हाय हाय! या गोष्टीचा विचार केला असतां मला म्हणणें भाग पडतें कीं प्रभु येशू ख़्रीस्तामुळें ज्यांस जाती बाहेर व कुलाबाहेर केलें जातें व त्या कारणामुळेंच ज्यांचा पाठलाग होतो ते धन्य आहेत. कारण ते प्रभूच्या पवित्र लोकांत गणिले जातील. प्रभु येशूनें स्वतां म्हटलें आहे कीं -

**श्लोक**

**न्यायीपणासाठीं जयांस गांजिती।**
**ते धन्य स्वर्गीं चिर राज्य पावती॥ १॥**

## १९ जात व नातलग यांच्या अधिकारापेक्षां देवाचा अधिकार मोठा आहे.

आणखी हाही विचार करा कीं कोणाचें म्हणणें मोठें आहे. जात भाऊबंद यांचें कीं देवाचें? तुमचें मन तुम्हांस ग्वाही देतें कीं देवाचें म्हणणें मोठें आहे. तुम्ही मराल तेव्हां तुमचे भाऊबंद तुमच्या बरोबर येतील काय? कधींही येणार नाहींत. म्हणून जर तुम्ही खऱ्या अंतःकरणानें प्रभू येशूचे शिष्य होतां व त्यामुळें लोक जाती बाहेर व गोताबाहेर करितात व तुम्हांस शाप देतात तर त्याची पर्वा करूं नका. तुम्हांस दुःख व त्रास होईलच. पण तुम्हांस ठाऊक आहे कीं हें दुःख थोड्या दिवसांचें आहे. पण मरणानंतर तुम्हांस स्वर्गांत जागा मिळेल व तेथें तुम्ही सर्वकाळ सुखांत व आनंदांत रहाल. जर तुम्ही नातलगांच्या भयानें आपला विश्वास लपवून ठेवाल तर लोक तुमचा पाठलाग करणार नाहींत हें खरें, पण मरणानंतर न्यायाच्या दिवशीं परमेश्वर तुम्हांस विचारील कीं तुम्ही माझ्या वचनाचा अव्हेर कां केलांत? व आपल्या भाऊबंदाची गोष्ट, जी माझ्या वचनाच्या विरुद्ध होती ती कां मानिलीत? मी तुम्हांस आकाशांत रहाण्यास अयोग्य समजून नरकाच्या अग्नींत टाकितो. 'अहो अन्याय

करणाऱ्यांनो मजपासून पळा.' त्या वेळीं तुम्हीं त्यास काय उत्तर द्याल तें सांगा. त्या वेळीं नातलगांच्या संगती ऐवजीं भुतें व दुष्ट लोक यांच्या सहवासांत तुम्हांस अक्षय काळपर्यंत नरकांत रडत व दुःख करीत रहावें लागेल.

## २० या जगांत येशू हाच तारणारा असून परलोकीं तोच न्याय करणारा आहे.

आतां माझ्या हिंदु मित्रांनो, मी तुम्हांस विनंति करितों कीं तुम्ही आपला तारणारा प्रभु येशू ख्रीस्त याचा खऱ्या अंतःकरणानें अंगीकार करा. प्रभु येशू ख्रीस्ताचें नांव गाजविल्यानें मी देवास एकीकडे ठेवीत आहे असें अगदीं समजूं नका. असें मुळींच नाहीं. परमेश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता व प्रभु आहे. परंतु मी तुम्हांस हें सांगतों कीं परमेश्वर न्यायी व पवित्र आहे. मी तुम्ही व जगांतले सर्व लोक पाप केल्यामुळें अपवित्र व भ्रष्ट झालों आहों. व म्हणून परमेश्वरापासून दूर केलेले असें झालों आहों. कारण कीं परमेश्वर पापाचा वीट मानितो. यास्तव परमेश्वराचा पुत्र प्रभु येशू ख्रीस्त हा मध्यस्थ होऊन समेट करण्याकरितां या जगांत आला. तो आपल्या लोकांच्या पापाचें ओझें आपणा स्वतांवर घेऊन आणि आपल्या न्यायीपणाचें फळ त्यांस देऊन त्यांचा देवाशीं समेट करितो व त्यांस स्वर्गाच्या मार्गानें नेतो. अशी गोष्ट दुसरा कोणी देव अगर मनुष्य करूं शकत नाहीं. कारण कीं ते स्वतां पापी व दुर्बल आहेत. तर ते मध्यस्थ कसे होऊं शकतील? प्रभु येशू ख्रीस्ताच्या वचनाचा धिःकार करूं नका. त्याचा धिःकार करणें हें तारणाऱ्याचा धिःकार करणें असें आहे. आणि तारणाऱ्यावांचून तुमचें तारण कसें होईल? जर कोणी वैद्य आपणाबरोबर औषध घेऊन सर्व बाजारभर फिरेल व मोठ्या शब्दांनीं ओरडेल कीं 'अहो सर्व दुखणाइतांनो मजपाशीं या. जें घेण्याकडून तुम्ही अगदीं निरोगी व्हाल अशा कांहीं प्रकारचें औषध मी तुम्हांस फुकट देईन.' तर बहुत आजारी लोक आनंदानें त्याजकडे जातील व त्याचें औषध घेऊन आपला फायदा करून घेतील. पण जर कोणी आजारी मनुष्य मूर्खपणानें अगर गर्वानें त्याजकडे जाणार नाहीं तर तो दोष त्याचा आहे. आणि त्या दोषाबद्दलचें फळ त्यास भोगावें लागेल. म्हणजे तो तसाच दुखण्यांत पिचत पडून राहील व बरा होणार नाहीं. याप्रमाणेंच प्रभु येशू ख्रीस्त हा आत्म्याच्या रोगाचा वैद्य आहे. तो सांगत आहे कीं 'अहो सर्व लोकांनो जे तुम्ही तारणाच्या उपायाचा शोध करितां करितां थकून गेला आहां ते सर्व तुम्ही मजकडे या म्हणजे मी तुम्हांस विसांवा देईन.' तर तुम्ही त्याजपाशीं कां जात नाहीं? नरकाच्या वाटेनें कां जातां? जर कोणी मनुष्य दुर्दैवानें आपली मालमत्ता गमावील तर मेहनत व उद्योग करून हळूहळू पुन्हां कांहीं तरी मिळवूं शकेल. परंतु येशू ख्रीस्ताचा अव्हेर करून जो एकदां आपल्या जीवाची हानी पावला त्याची ती हानी पुन्हां कधींही भरून येणार नाहीं.

आणखी एक गोष्ट ऐका. प्रभु येशू ख्रीस्त जो एकदां पाप्यांचें तारण करण्याकरितां अवतार घेऊन गरीबीनें व नम्रतेनें या जगांत आला होता तो हल्लीं उंचावलेला होऊन आकाशाच्या सिंहासनावर बसलेला आहे. तोच येशू जगाच्या शेवटीं पुन्हां येईल परंतु पहिल्या वेळीं जसा तो गरीबीनें आला तसा येणार नाहीं. पण मोठ्या गौरवानें व वैभवानें येईल. तो त्यावेळीं सर्व नीतीमानांस आपल्याजवळ बसवील व ते त्याजसंगतीं सर्वकाळ सुखांत व आनंदांत रहातील. तसेंच तो दुष्टांचाही न्याय करील. त्यावेळीं तो प्रत्येक अभक्त व दुष्ट मनुष्यापासून, त्याच्या सर्व पापांबद्दल - मग तीं कोणत्याहीं तऱ्हेनें केलेलीं असोत - हिशोब घेईल आणि त्यांस नरकांत टाकील.

आतां विचार करा. नरक म्हणजे देवानें आपल्या शत्रूंसाठीं तयार केलेली भयंकर दुःखाची जागा आहे. जे कोणी त्या जागेंत टाकिले जातील ते रडत व दांत खात अग्नि व गंधक यांच्या सरोवरांत युगानुयुग तळमळत राहतील.

## २१ दुष्टांचा परिणाम जो नरकदंड त्यापासून सुटका.

पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं, ‘परंतु भेंकड व अविश्वासी व ओंगळ व घातक व व्यभिचारी व चेटकी व मूर्तिपूजक व सर्व लबाड यांचा भाग, जें सरोवर अग्नीनें व गंधकानें जळतें त्यांत होईल.’ या गोष्टीविषयीं विचार करा व भयभीत व्हा. तारणाचा शोध करणाऱ्या प्रत्येकासाठीं परमेश्वराच्या दयेचा दरवाजा आतां खुला आहे. पण जर तुम्ही या जगांत त्याच्या दयेचा व कृपेचा धिःकार कराल तर शेवटल्या दिवशीं तुम्हांवर त्याचा राग कोसळेल. प्रभु येशू ख्रीस्ताची प्रीति व तारण यांस आतां जर तुम्ही तुच्छ मानितां तर परलोकीं तुमचा उद्धार होण्याची आशा नाहीं. अहो मित्रांनो जोंपर्यंत तुम्ही जीवंत आहां तोंपर्यंत तुम्हांस आशा आहे. पण मरण समयीं आत्मा शरीरापासून वेगळा होईल. तेव्हां वेळ निघून जाईल व तुमची तारणाची आशा समूळ नाहींशी होईल. यासाठीं मी तुमची विनंति करितों कीं, अहो सर्व लोकांनो जे तुम्ही पापाखालीं दबून गेले आहां ते सर्व तुम्ही आपल्या आत्म्याच्या उद्धाराचा अगत्यपूर्वक ताबडतोब शोध करूं लागा. प्रभु येशू ख्रीस्तानें तुमच्या पापांची क्षमा करावी व परलोकीं तुमचें पूर्ण कल्याण व्हावें म्हणून तुम्ही लवकर प्रभु येशू ख्रीस्ताचे शिष्य व्हा.

**इति धर्मतुला समाप्त.**

------------

# भाग दुसरा - ख्रिस्ती धर्म निरीक्षण

## १ देवाकडून मनुष्यास आलेला निरोप पवित्र शास्त्रांत आहे.

ज्या ग्रंथांत खऱ्या धर्माचीं म्हणजे ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्वें, सिद्धांत, इतिहास, वगैरेंचे वर्णन केलेलें आहे त्या ग्रंथास होली बायबल म्हणजे पवित्र शास्त्र असें म्हणतात. तें शास्त्र ईश्वरानें आपल्या निवडलेल्या भक्तांकडून निवडिलें. त्या पवित्र पुस्तकांत लिहिलेल्या गोष्टी मी आतां तुम्हांस सांगणार आहे. त्यांत लिहिलें आहे कीं जगांतील सर्व लोक पापी आहेत व पापामुळें शिक्षेस पात्र झाले आहेत. त्याप्रमाणेंच असें हीं लिहिलें आहे कीं पाप्यांस पापापासून सोडविण्याकरितां व पापाच्या अंधकारांतून काढण्याकरितां प्रभु येशू ख्रिस्त जगांत आला. व त्यानें अनेक प्रकारचीं दुःखें सोसून आपला प्राण दिला. व तीन दिवसपर्यंत तो कबरेंत राहिला. तरी तिसरे दिवशीं तो मेलेल्यांतून पुन्हां उठला. आणि नंतर वर आकाशांत चढून गेला. आणखीं लिहिलें आहे कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो व त्याचा शिष्य होतो व त्यास आपला तारणारा असें मानितो तो ख्रिस्ताच्या पुण्याकडून व मध्यस्थीकडून पातकांची क्षमा व पूर्ण तारण पावतो. या गोष्टीविषयींचें मी आतां विस्तारें करून वर्णन करितो. चित्त देऊन ऐका.

## २ स्वभावतः सर्व मनुष्यें पापी आहेत.

सर्व मनुष्य जातीची स्थिति जन्म स्वभावें करून कशी आहे याचें पहिल्यानें वर्णन करितों. पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं प्रारंभीं ईश्वरानें एक मनुष्य व एक स्त्री, पवित्र व न्यायी अशी उत्पन्न केलीं. परंतु सैतानानें त्यांस फसवून पापांत पाडिलें. तेव्हांपासून त्यांची सर्व संतति म्हणजे सर्व मनुष्यजात पापिष्ट झाली. कारण जसें झाड तशा त्याच्या फांद्या होणार. जर मूळ कडू असेल तर फांद्याही कडूच होतील. याप्रमाणें जेव्हां आपले पहिले आईबाप पापी झाले तेव्हां पृथ्वींतले सर्व लोक त्यांचे वंशज असल्यामुळें तेही त्यांच्यासारिखेच पापी झाले आहेत.

**श्लोक**

**॥ जसा वृक्ष तैशीच शाखा त्याची ॥**
**॥ झऱ्यासारिखी सर्वदा धार त्याची ॥**
**॥ जशी सर्पिणी तैशीं बाळें तियेची ॥**
**॥ अगूणांतुनी गूण कैसा निघे ची ॥**

बरोबर आहे. ही गोष्ट खरी आहे कीं पृथ्वीच्या पाठीवरील एकंदर सर्व माणसें मोठी लहान, राव रंक, श्रीमंत दरिद्री, विद्वान अविद्वान, हिंदु युरोपियन, हे सर्व जन्म स्वभावें करून भ्रष्ट व पापी आहेत. मनुष्याच्या हिकमतीकडून व गर्वाकडून या देशांत निरनिराळ्या जाति स्थापिल्या गेल्या आहेत. कोणी ब्राह्मण, कोणी क्षत्रीय, कोणी वैश्य, व कोणी शूद्र झाले आहेत. परंतु परमेश्वराच्या दृष्टींत जात, मोठें नांव अगर पदवी यांची कांहीं मातबरी नाहीं. त्याच्या समोर सर्व मनुष्य एकाच जातीची आहेत, आणि तीं सर्व जन्मतः पापी आहेत.

## ३ ईश्वराच्या आज्ञा मोडणें हें पाप होय.

आपणां मनुष्यांस मार्ग दाखविण्याकरितां ईश्वरानें दाहा आज्ञा दिल्या आहेत. जे कोणी त्या आज्ञा मोडितात ते पापी होतात. त्या आज्ञांप्रमाणें पाप काय आहे हें मी सांगतों.

जो कोणी निराकार परमेश्वरास सोडून देव, देवी यांस मानून स्वतः आपण त्यांची पूजा करितो अगर दुसऱ्याकडून करवितो तो पाप करितो. जो कोणी परमेश्वराचें नांव व्यर्थ घेतो व त्याच्याकडे लक्ष नसतांही त्याच्या नांवाचा जप करितो अगर एखाद्या खोट्या गोष्टीचा खरेपणा स्थापित करण्याकरितां त्याचें नांव तोंडांत घेतो तो पापी आहे. जो कोणी आपले आईबाप व वडील यांचा सन्मान करीत नाहीं पण त्यांची आवगणना करितो तो पापी आहे. तुम्हांस ठाऊक आहे कीं पुष्कळ लोक आपल्या वृद्ध मातापितरांवर रागें भरतात, त्यांस शिवीगाळ देतात. कोणी कोणी तर त्यांस पोटभर खावयासही देत नाहींत. ती जीवंत आहेत तेथपर्यंत त्यांस दुःख व त्रास देतात. परंतु जेव्हां तीं मरतात तेव्हां त्यांचें पिंडदान करण्याकरितां गयेस जातात. आणि मग आपल्या आईबापांचा सन्मान करूं लागतात.

### श्लोक

**॥ जिवंता पित्या संगतीं भांडताती ॥**
**॥ निमाल्यावरी प्रेत गंगेस नेती ॥**
**॥ जिवंता पित्याची पुसेनाति गोष्ट ॥**
**॥ मृता पीतया अर्पिती डाळभात ॥**

आतां मला सांगा कीं ही उलटीच गोष्ट आहे कीं नाहीं? जोंपर्यंत आईबाप जीवंत आहेत तोंपर्यंत त्यांची सेवा चाकरी केली पाहिजे आणि जेव्हां तीं मरण पावतात तेव्हां त्यांस परमेश्वराच्या हातांत सोंपून दिलें पाहिजे. परंतु सैतानानें त्यांच्या अंतःकरणांत अशी भुरळ घातली आहे कीं आईबाप जीवंत असतां त्यांचा मान सन्मान न केला तरी चिंता नाहीं कारण कीं ती मेल्यावर त्यांचें श्राद्ध घालितां येतें. आतां सांगा कीं कोणाची आज्ञा ऐकिली पाहिजे?

याप्रमाणेंच जर कोणी मनुष्य कोणा मनुष्यास ठार मारितो अगर कोणाचा मत्सर किंवा द्वेष करितो, कोणाचें वाईट व्हावें असें इच्छितो, अगर झगडे व लढाया माजवितो किंवा कोणास शिवीगाळ करितो किंवा कोणावर विनाकारण रागें भरितो किंवा कोणाची निंदा करितो, सारांश जेणेंकडून दुसऱ्याच्या शरीरास अगर मनास विनाकारण दःख होतें असें कोणतें काम करितो तो पापी आहे. तुम्हांस ठाऊक आहे कीं पुष्कळ लोक द्वेषानें आपल्या वैऱ्याचा सत्यनाश व्हावा असें इच्छितात. आणि कोणी कोणी तर इतके दुष्ट व अघम असतात कीं आपल्या वैऱ्याचा नाश व्हावा म्हणून देवसकी करितात. अशा देवसकीस व अशा देवसकी करणाऱ्यास हायहाय, जे कोणी अशीं कामें करितात ते ईश्वराच्या दृष्टींत खुनी म्हणजे हत्या करणारे आहेत.

जे लोक परद्वार करितात अगर पुरुष संभोग करितात, जे दुसऱ्याच्या बायकोकडे काम दृष्टीनें पाहतात, आपल्या मनांत अशुद्ध व मलीन विचार बाळगितात, किंवा ज्याकडून ऐकणाऱ्यांच्या मनांत दुष्ट इच्छा उत्पन्न होईल अशा प्रकारचे विचकट व बीभत्स शब्द उच्चारितात, ते सर्व मोठे पातकी आहेत.

जे कोणी चोऱ्या करितात, कपटानें दुसऱ्यास ठकवितात, खोटीं वजनें वापरितात, माल देतांना दांडी मारितात, माल कमी देतात, माल भिजवून अगर त्यांत कशाची तरी भेसळ करून विकितात, एक नमुना दाखवून दुसऱ्याच प्रकारचा माल देतात, धन्यास फसविण्यासाठीं दुकानदाराशीं संगनमत करितात, अक्रीत व्याज घेतात, लांच खातात अगर लांच देतात, सारांश लोकांपाशीं दगाबाजी अगर बेइमानी करितात, अशीं कामें करणारे सर्व लोक पापी आहेत.

जे केणी खोटी साक्ष देतात अगर दुसऱ्याकडून देववितात, जे स्वतां खोटी शपथ वाहतात अगर दुसऱ्याकडून वाहवितात, जे स्वतां खोटें बोलतात अगर दुसऱ्याकडून बोलवितात, तसेंच देवानें आपणांस जें दिलें आहे तितक्यानें तृप्त न होतां जें दुसऱ्याच्या मालमत्तेवर लोभ ठेवितात ते सर्व पापी आहेत.

परमेश्वराच्या दाहा आज्ञांचा सारांश खालीं लिहिलेल्या दोन ओव्यांत आला आहे. त्या ओव्या ह्या आहेत. पहिलीः- 'तुझा देव प्रभु यावर तूं आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जीवानें व आपल्या सर्व शक्तीनें व आपल्या सर्व मनानें प्रीति कर.' दुसरीः- 'जशी आपणांवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर.' आतां विचार करा कीं जो कोणी खऱ्या अंतःकरणानें परमेश्वरावर प्रीति करितो त्यास सोडून मूर्तींची पूजा करील आणि खऱ्या व जीवंत परमेश्वराची भक्ति करणार नाहीं असें कधीं होईल काय? तो त्याचें नांव व्यर्थ कसें घेईल? तसेंच जो कोणी जशी आपणांवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति करितो तो आपल्या शेजाऱ्याचा द्वेष कसा करील? तसेंच दुसऱ्याचा घातपात कसा करील? किंवा दुसऱ्याच्या विरुद्ध खोटें कसें बोलेल? सारांश परमेश्वरावर प्रीति करणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि जोपर्यंत ही प्रीति तुमच्या अंतःकरणांत नाहीं, तोंपर्यंत जें कांहीं तुम्ही करितां तें सर्व पाप असें समजलें जाईल.

## ४ तुम्ही पाप केलें आहे कीं नाहीं.

आतां तुम्ही आपल्या अंतःकरणांत विचार करून निर्णय करा कीं आपण ईश्वराच्या आज्ञा उल्लंघिल्याकडून पाप केलें आहे कीं नाहीं. एका दिवसांतच तुम्ही किती पाप कर्म करितां, किती वाईट शब्द बोलतां, आणि किती वाईट विचार मनांत आणितां? तर मग तुम्ही आपल्या जन्मापासून आजपर्यंत जीं जीं पापें केलीं आहेत त्यांचा हिशोब केला तर तीं सगळीं मिळून किती गणती होईल? तुमचीं पापें व अपराध अगणित होतील यांत बिलकुल संशय नाहीं. आणखी असेंही समजा कीं हीं जीं सर्व प्रकारचीं पापें तुम्ही मनानें, वाचेनें, कायेनें केलीं आहेत तीं दुसऱ्या कोणास ठाऊक असोत कीं नसोत तीं सर्व परमेश्वरास ठाऊक आहेत कारण तो सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे. त्यापासून कोणतीही गोष्ट लपली जात नाहीं. पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं, 'कोणी समजून देवाला शोधितो कीं नाहीं हें पाहावें म्हणून देवानें आकाशांतून मनुष्यांकडे पाहिलें. तेव्हां त्यास दिसून आलें कीं ते सर्व मागें सरले आहेत. झाडून घाणेरडे झाले आहेत. सुकर्मी कोणी नाहीं. एक देखील नाहीं. (गीत ५३ः२-३)'

तेव्हां त्यानें म्हटलें आपला न्याय व पवित्रता ह्याप्रमाणें म्हटलें म्हणजे त्यास शिक्षा दिली पाहिजे. पण परमेश्वर असा नीतिमान व न्यायी आहे तसाच तो दयाळू व कृपाळूही आहे. म्हणून जेव्हां त्यानें पाहिलें कीं जगातले सर्व लोक पापी आहेत व शिक्षेस पात्र आहेत तेव्हां त्यानें आपल्या मोठ्या दयेनें ज्याकडून मनुष्य जात पापाबद्दलची शिक्षा व पापाची सत्ता यांपासून सुटका पावेल असा त्यांच्या तारणाचा एक उपाय योजिला.

## ५ ईश्वरानें योजिलेला तारणाचा उपाय.

आतां, पापक्षमा व तारण मिळण्याचा जो हा पाय त्याविषयीं मी तुम्हांस सांगतों. चांगलें लक्ष लावून ऐका.परमेशवराचा एकुलता एक पुत्र येशू ख्रीस्त आहे. तो आपल्या परम प्रीतीनें व करुणेनें आकाशाचें वैभव सोडून या जगांत आला. आणि त्यानें मनुष्याची प्रकृति व रूप हीं धारण केलीं. यासाठीं कीं परमेश्वरानें पाप्यांस जी शिक्षा ठरविली होती ती आपणांवर घ्यावी व अशा रीतीनें त्यांस तारणाची प्राप्ति करून द्यावी. जर तुम्ही प्रभू येशू ख्रीस्त कोण आहे हें समजण्याकरितां त्याचें चरित्र म्हणजे त्याची गोष्ट ऐकूं इच्छितां तर ती मी आतां तुम्हांस सांगतों.

फार प्राचीनकाळीं जेव्हां पाप जगांत आलें तेव्हां परमेश्वरानें आपल्या निवडलेल्या सेवकांकडून म्हणजे भविष्यवाद्यांकडून 'मी आपल्या पुत्रांस, नेमिलेल्या वेळीं, जगाच्या तारणाकरितां पाठवीन' असें वचन पूर्वींच दिलें होतें यासाठीं कीं लोकांनीं त्याची वाट पहावी. 'जेव्हां काळाची पूर्णता झाली' तेव्हां येशूनें आकाशांतून उतरून येहूदा प्रांतात येऊन जन्म घेतला. तो मोठ्या डौलानें व थाटामाटानें आला नाहीं. तर गरीबीनें व नम्रतेनें या जगांत आला. कारण त्याची अशी इच्छा होती कीं जगांतल्या हीन दीन पापी लोकांनीं त्याच्या पुण्याच्या विपुलतेकडून धनवान व्हावें व तारण पावावें. राम, कृष्ण, महादेव इत्यादिकांप्रमाणें लीला क्रीडा करण्यास अगर लढाया युद्धें करण्यास अगर ठकबाजी करण्यास अगर कोणाचा नाश करण्यास अगर कोणाचा संहार करण्यास तो आला नाहीं. परंतु दीन पाप्यांचें तारण करण्याकरितां त्यानें अवतार घेतला. तो तुमच्या अवतारांप्रमाणें पाप्यांचा नाश करण्यासाठीं आला नाहीं. तर पापी लोकांच्या पापांचा नाश करून त्यांची पापापासून सुटका करण्याकरितां तो आला. तो स्वतां पापापासून अगदीं अलिप्त असे व नेहमीं सर्व प्रकारचीं चांगलीं कामें करीत व लोकांस तारणाविषयीं उपदेश करीत फिरत असे. शब्दमात्रेंकरून त्यानें अंधळ्यांस दृष्टि दिली, बहिऱ्यांस कान दिले. लंगड्यांस पाय दिले, छोट्यांस व लुळ्यांस हात दिले. सर्व प्रकारचें रोगी व दुःखी लोक त्याजकडे येत असत. व तो केवळ शब्द बोलण्याकडून त्यांस बरें करीत असे. कोडी लोक त्यांजकडे येऊन विनंती करीत कीं 'हे प्रभु आम्हांवर दया कर' आणि त्याच्या आज्ञेकडून त्यांचें कोड जात असे. भूतग्रस्त व दुष्ट आत्म्यांनीं पीडलेले यांस ही त्याजकडे आणीत असत व तो आज्ञा करण्याकडून भुतें घालवी व भूतग्रस्तांस मुक्त करी. एखाद्या झीपी गेलेल्यास आपण जागें करितों त्याप्रमाणें तो मेलेल्यांस जीवंत करीत असे. जे दुष्ट लोक त्यास दुर्भाषणें बोलत व त्याचा छळ करीत त्यांचेंही तो बरें करीत असे.

त्यांस कोणी अपशब्द बोलले तरी तो  कोणास अपशब्द बोलत नसे. कोणी त्यास दुःख दिलें तर तें तो सोशी व त्या दुःख देणाऱ्यास धमकावीत नसे. या जगांतलें वैभव तुच्छ मानून तो म्हणत असे कीं, 'मी सेवा करून घ्यावयास नाहीं तर सेवा करावयास व बहुतांची खंडणी व्हावी म्हणून आपला जीव द्यावयास आलों.' तसेंच प्रभु येशू ख्रिस्त कोणाच्या मोठेपणाकडे अगर पदवीकडे पाहून वागत नसे. मोठे लहान, उंच नीच, श्रीमंत दरिद्री, ज्ञानी अज्ञानी, वृद्ध तरुण, पुरुष स्त्री यांपैकीं जे कोणी आपली दुखणी बरीं करून घ्यावयास अगर तारणाचें वचन ऐकावयास त्यांजपाशीं येत त्यांस तो कधीं घालवीत नसे. तो सर्वज्ञ असल्यामुळें त्यांस सर्वांच्या अंतःकरणांची स्थिति कळत असे. म्हणून आपल्या खऱ्या अमतःकरणानें कोण येतो व ढोंगानें कोण येतो हें त्यास कळत असे. जेव्हां कोणी ढोंगी त्याजकडे येत तेव्हां ते कितीही विद्वान असले अगर मोठे पदवीवाले असले तरी तो त्यांची खरडपट्टी काढिल्यांवाचून रहात नसे. पण, जे कोणी शुद्ध भावानें त्याजकडे येत ते कितीही वाईट व कसेही पापी असले - मग ते पुरुष असोत अगर स्त्रिया असोत - तरी तो त्यांचें दुःख व पाप यांचा परिहार करीत असे. ते येशूकडे येत तेव्हां रोगी व दुःखी असे असत पण घरीं जात तेव्हां बरे झालेले व आनंदी असे असत. जे कोणी आपल्या पापामुळें दुःखी होऊन रडत साहायार्थ येशूकडे येत ते आपल्या पापांची क्षमा पावून मोठ्या आनंदानें आपल्या घरीं परत जात.

## ६ येशू ख्रीस्ताच्या उपदेशांची कांहीं उदाहरणें.

प्रभु येशु ख्रीस्ताचा उपदेशही अशा प्रकारचा असें कीं तो ऐकून लोक आश्चर्य भरित होऊन म्हणत कीं 'ह्याचा उपदेश आमच्या शास्त्र्यांसारिखां नाहीं. पण अधिकार असल्यासारिखा हा उपदेश करितो.' मासल्याकरितां त्याच्या उपदेशांपैकीं कांहीं गोष्टी मी लिहितोः-

एकें ठिकाणीं त्याने म्हटलें आहे कीं:-

**श्लोक**

आत्म्यानें जे गरिब जन ते धन्य, कीं राज्य त्यांचें ॥
आकाशाचें, वरितिल समाधान शोकार्त साचे ॥
पृथ्वी त्यांचें वतन सुमहा-भाग जे नम्र होती ॥
न्यायत्वाची अतिशय तृषा भुक्ति त्या होत मुक्ति ॥ १ ॥

**श्लोक**

दयाशील ते धन्य कीं ईश्वराची ॥
दया त्यांवरी होतसे पूर्ण साची ॥
मना माजिं जे शुद्ध ते धन्य जाणा ।
स्वयें ते पहातील कीं देव राणा ॥ १ ॥

**श्लोक**

शांती करीती जन धन्य जे क्षिती ॥
होतील ते देव कुमार निश्चिती ॥
न्यायीपणासाठींच ज्यांस गांजिती ॥
ते धन्य स्वर्गीं चिर राज्या पावती ॥

दुसरें एकें ठिकाणीं प्रभु येशू ख्रीस्तानें सांगितलें आहे कीं:-

**ओव्या.**

प्रीति आपुल्या शेजाऱ्यावरी । करी वैऱ्याचा द्वेष परी ॥
सांगितलेंसें पूर्वीं यापरी । एकिलें तुम्ही आहेची ॥ १ ॥
परी मी सांगतों तुम्हांप्रती । करी वैऱ्यावरी प्रीति ॥
तुम्हांलागी जे शापिती । आशीर्वाद त्यांस द्या ॥ २ ॥
द्वेष तुमचा जे करिती । त्यांचें बरें करा निश्चिती ॥
तुम्हां गांजिती पाठीस लागती । त्यांच्यासाठीं प्रार्थना करा ॥ ३ ॥

**प्रीती धर्म पालन कराल । ऐशारीती वागाल ॥**
**तरी आपल्या आकाशांतील । बापाचे व्हाल पुत्र तुम्ही ॥ ४ ॥**
**कांकीं वाईटा चांगल्या वरी तो । आपल्या सूर्यास उगववितो ॥**
**न्याया अन्यायी वरी पाडितो । पाऊस सारिखा सर्वदां ॥ ५ ॥**

## ७ अंतःकरणाचा पालट झाला पाहिजे.

दुसरें एकें प्रसंगीं ख्रीस्तानें सांगितलें आहे कीं:-

**आर्या**

**तुम्ही जर पालटूनी । लघुबाळां सारिखे न होणार ॥**
**तरि कधिं प्रवेश तुमचा । नाहीं आकाश राज्यीं होणार ॥ १ ॥**

ह्याचा भावार्थ आहे कीं जर तुम्ही आपलें नांव, जात, कुळ, सत्कृत्यें यविषयींचा अभिमान वाहणें सोडून लहान लेकरांसारिखें गरीबीने व नम्रतेनें परमेश्वराचें म्हणणें मान्य करणार नाहीं तर तुम्हांस कधींही तारण प्राप्ती होणार नाहीं.

एक पंडित तारणाच्या मार्गाचा शोध करीत प्रभु येशू ख्रीस्तापाशीं आला. तेव्हां प्रभूनें सांगितलें कीं:-

**ओव्या**

**मी खचित सांगतों तुज लागून । पुन्हां जन्मलिया वांचून ॥**
**कोणाच्यानेंही देव राज्य जाण । पहावत नाहीं कधींही ॥ १ ॥**

**जें जन्मलें देहापासून । तें आहे देह जाण ॥**
**जें जन्मलें आत्म्यापासून । आत्मा तेंची असें कीं ॥ २ ॥**

त्याच पंडितास ख्रीस्तानें म्हटलें आहे कीं:-

**श्लोक**

**देवानें इतकी जगावरि पहा केली प्रीती पुष्कळ ॥**
**कीं जो एकुलता स्वपुत्र अपुला तो दीधला सोज्वळ ॥**
**जो कोणी जन त्या सुतावरि खरा विश्वास ठेवील हो ॥**
**व्हावी तारण प्राप्ति नाश न कधीं व्हावा तयाचा अहो ॥ १ ॥**

### ओवी

**जग अन्यायी ठरविण्यासाठीं । देवें न धाडिलें स्वपुत्रा जगतीं ॥**
**परी त्या व्हावी तारण प्राप्ति । तद्वारें म्हणोनि पाठविलें ॥ १ ॥**

प्रभू येशू ख्रीस्ताच्या उपदेश मालेंतून या दोन चार गोष्टी मासल्यादाखल मीं सांगितल्या आहेत. आणखी पहाण्याची जर तुमची इच्छा असेल तर पवित्र शास्त्रांतील उत्तर भाग ज्यास नवा करार म्हणतात व ज्यांत प्रभु येशू ख्रीस्तांचें चरित्र म्हणजे गोष्ट आहे तो वाचून पहा. तो तुम्हांस मिशनरीपाशीं मिळेल.

## ८ पाप्यांकरितां प्राण अर्पण करून येशू ख्रीस्तानें आपलें सामर्थ्य वगैरे कसें दाखविलें.

अशा प्रकारचीं प्रीतीची व दयेचीं कामें करून व खऱ्या धर्म सिद्धान्ताचा उपदेश करून प्रभु येशू ख्रीस्तानें आपलें गौरव व सामर्थ्य हीं जगास प्रसिद्ध (प्रकट) केलीं. शिवाय तो वारंवार आपल्या शिष्यांस सांगत असे कीं असा दिवस येईल कीं त्यी दिवशीं माझे शत्रू मला धरितील व खांबावर खिळून मारितील. पण तीन दिवसांनंतर मी मेलेल्यांतून पुन्हां उठेन. तसेंच जर मला वाटेल तर मी आपल्या शरीराचें रक्षण करूं शकेन पण तशानें जगाचें तारण कसें होईल? आपल्या लोकाचें तारण व्हावें म्हणून मी त्यांचा बदला (जामीन) होऊन त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा मीं आपणांवर घेतली आहे. आणि मी स्वखुषीनें आपल्या जीवाचें पापार्पण करणार आहें. प्रभुनें पूर्वीं सांगितल्या प्रमाणेंच सर्व गोष्टी घडून आल्या. दुष्ट लोकांनीं त्यास धरिलें व कोणत्या तरी रीतीनें त्यास मारावें असा मनसोबा केला. पण त्याच्या ठिकाणीं कांहीं एक दोष दिसून आला नाहीं. तेव्हां बनावट साक्षीदारांच्या मदतीनें त्यास अपराधी व दंडपात्र ठरविलें तेव्हां त्यास फटके मारिले व त्याच्यावर नानाप्रकारची जुलूम जबरदस्ती केली. तरी प्रभु येशू ख्रीस्तानें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. नंतर त्यांनीं एक मोठा क्रूस म्हणजे एक उंच लाकडाशीं दुसरें लाकूड आडवें बांधिलेलें असतें तो जमिनींत पुरून उभा केला. आणि प्रभु येशू ख्रीस्तास त्यावर चढवून त्याच्या हातापायांत खिळे ठोकिले. अशा यातनांत रक्त पाडीत असतां, सुमारें साहा तासपर्यंत तो क्रूसावर राहिला. त्यास जे दुःख देणारे होते ते त्यांस हांसत व त्याची थट्टा करीत होते. तरी प्रभु येशू ख्रीस्तानें तशा प्रकारच्या वेदना व दुःख भोगीत असतां ही त्यांच्यासाठीं प्रार्थना केली कीं ‘हे बापा त्यांची क्षमा कर ,कारण कीं ते काय करितात हें त्यांस समजत नाहीं.’ नंतर दुपार झाल्यावर एकाएकीं अंधार पडला व सुमारें तीन तासपर्यंत तसाच अंधार होता. तेव्हां प्रभूनें ओरडून म्हटलें ‘पूर्ण झालें. हे बापा मी आपला आत्मा तुझ्या हातांत सोंपून देतो.’ आणि असें बोलून त्यानें प्राण सोडिला. त्याच्या मरणसमयीं भूमीकंप झाला, खडक फुटले, थडीं उघडलीं. झोपीं गेलेले पवित्र लोक यांतील बहुतांचीं शरीरें उठलीं व ते पुष्कळांच्या दृष्टीस पडले.

नंतर दोन मोठे पदवीवाले असामी जे प्रभूचे शिष्य होते त्यांनीं बेधडक त्या प्रांतांच्या सुभेदाराकडे जाऊन प्रभूचें शरीर मागितलें. त्यांनीं ख्रीस्ताच्या हातांपायांतले खिळे काढून टाकिले. त्याचें शरीर क्रूसावरून खालीं उतरिलें व तें तागाच्या स्वच्छ वस्त्रांत गुंडाळून खडकांत खोदलेल्या एका कबरेंत ठेविलें. नंतर त्याच्या शत्रूंनीं त्या कबरेच्या तोंडावर एक मोठी धोंड ठेवून कबरीची रखवाली करण्याकरितां शिपायांचा पहारा बसविला.

## ९ ख्रीस्ताचें मेलेल्यांतून पुन्हां उठणें व आकाशांत चढून जाणें.

तीन दिवसपर्यंत प्रभू येशू ख्रीस्त कबरेंत राहिला. मग तिसरें दिवशीं आदितवारीं काय झालें म्हणाल तर सकाळीं मोठ्या पहांटेस मोठा भूमीकंप झाला. व एका देवदूतानें आकाशांतून उतरून, कबरेच्या तोंडावर जी धोंड बसविलेली होती ती एकीकडे सारिली. आणि प्रभु येशू ख्रीस्त उठून तींतून जीवंत बाहेर आला. नंतर चाळीस दिवसपर्यंत वारंवार त्यानें आपल्या शिष्यांस दर्शनें दिलीं व त्यांच्याशीं तो बोलला. नंतर एके दिवशीं एके ठिकाणीं जमवून त्यानें त्यांस आज्ञा दिली कीं ‘आकाशांत व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे. यास्तव तुम्ही जाऊन सर्व देशांतील लोकांस शिष्य करा. त्यांस बापाच्या, पुत्राच्या, पवित्र आत्म्याच्या नांवानें बाप्तिस्मा द्या. म्यां ज्या आज्ञा तुम्हांस दिल्या त्या सर्व पाळावयास त्यांस शिकवा.’ याप्रमाणें बोलून आपल्या शिष्यांस आशीर्वाद देत असतां, त्यांच्या देखत तो आकाशांत आपल्या बापाकडे चढून गेला.

## १० मनुष्य जातीचें पाप हरण करण्याकरितां येशू ख्रीस्तानें दुःख सोशिलें.

पहा मित्रांनो ह्याप्रमाणें येशू ख्रीस्ताची थोडक्यांत हकीगत आहे तुम्ही आतां हिच्याविषयीं विचार करा. व तिला आपल्या अंतःकरणांत जागा द्या. जर तुम्ही विचाराल कीं अशा चांगल्या व न्यायी मनुष्यानें इतकें दुःख व इतके क्लेश कां सोशिले? तर ह्याचें उत्तर असें आहे कीं त्यानें जगांतील लोकांच्या पापाबद्दलची शिक्षा आपणांवर घेऊन इतकें दुःख सोशिलें व अशा करण्याकडून परमेश्वराचा न्याय पूर्ण करून दिल. एक दाखला ऐका. कोणी एका मनुष्यानें एका सावकारापासून एक हजार रुपये कर्जाऊ काढिले. जेव्हां मुदत खलास झाली तेव्हां सावकारानें आपले रुपये मागितले. त्या बिचाऱ्या गरीब कर्जदारापाशीं देण्यास कांहीं नव्हतें. पण सावकार तर त्यास कांहीं केल्यानें सोडीना कारण त्यास ठाऊक होतें कीं हजार रुपये मुद्दल व त्यांचें व्याज घेणें त्याचा हक्कच होता. अशा अडचणींत कर्जदाराचा कोणी एका श्रीमंत मित्र त्या सावकाराकडे जाऊन म्हणाला, ‘त्या गरीबाकडे येणें असलेले तुमचे रुपये व्याजासुद्धां मी आपल्या पदरच्या पैशांतून भरून देतो.’ सावकारानें मोठ्या खुषीनें आपल्या रुपयांची भरपाई करून घेतली. व कर्जदारास फारखत लिहून दिली. याप्रमाणें त्या मनुष्याचें कर्ज, त्याच्या त्या श्रीमंत मित्राच्या मेहरबानीनें फिटलें जाऊन त्यास त्या कर्जाबद्दल जी शिक्षा झाली असती ती चुकली. तेव्हां तो कर्जदार आनंदित झाला नसेल काय? निःसंशय त्यास फारच आनंद झाला असेल. कारण त्यास ठाऊक होतें कीं आपल्या डोईवर जें कर्ज होतें तें आपल्याच्यानें फिटलें नसतें. पण आपल्या दयाळू मित्रानें आपणाबद्दल तें भरून दिलें व आपल्या डोईवरचा भार उतरिला. जर कोणी दयाळू मनुष्य आपल्या मित्राशीं या प्रकारची वागणूक करील तर तो मनुष्य त्या आपल्या मित्राचा आभारी होणार नाहीं काय? व त्यावर प्रीति करणार नाहीं काय?

पहा याप्रमाणें मी, तुम्ही व सर्व लोक पापामुळें परमेश्वराचे कर्जदार झालेले आहों. आणि तुमचीं सर्व धर्मकृत्यें व पुण्य कृत्यें हीं तें ओझें दूर करावयास अगदीं निरुपयोगी व असमर्थ आहेत .जर तुम्ही अशा विपन्न स्थितींत रहाल तर निराश व लज्जित होऊन अवश्य नरकांत जाल. कारण कीं परमेश्वर खरा, न्यायी व पापाबद्दल शिक्षा देणार आहे. तो आपला न्याय कधींही सोडणार नाहीं पण पाप्यांस अवश्य शिक्षा करील. आतां ऐकां. परमेश्वराचा एकुलता एक पुत्र प्रभु येशू ख्रीस्त हा माझा व तुमचा एक खरोखर मित्र आहे.. त्याची ममता व प्रीति

हीं अपरंपार आहेत. तशीच त्याची दया व कृपा हीं अपरंपार आहेत. पाप्यांवर जी शिक्षा यावयाची होती ती त्यानें आपणावर घेतली व पाप्यांच्या कर्जाचें ओझें आपणा स्वतांवर घेऊन तें भरून दिलें व परमेश्वरास संतुष्ट केलें. त्यानें मोठी दुःखें सोसून आपल्या जीवाचें अर्पण केलें. व परमेश्वराचा न्याय पूर्ण करून देऊन त्यानें आपणा मनुष्यासाठीं पापांची क्षमा व सार्वकालिक जीवन हीं सिद्ध केलीं आहेत. तर ही गोष्ट ऐकून तुम्ही आनंद व उल्हास करावा व पापांची क्षमा व तारण ह्या गोष्टी ख्रीस्ताकडून घेऊन त्याजवर प्रीति करावी हें तुम्हांस उचित आहे.

## ११ परमेश्वराची पाप्यांवर विलक्षण प्रीति.

पहा परमेश्वराची प्रीति केवढी मोठी आहे! परमेश्वरानें तुम्हांवर प्रीति करावी असें कोणतेंही सत्कर्म तुम्हीं केलेलें नाहीं अगर कांहीं पुण्य जोडिलेलें नाहीं. पण उलटें तुम्ही आपल्या जन्मापासून काया वाचा मनें करून पाप करीत आला आहां आणि आतां देखील प्रत्येक दिवशीं पाप करितां व परमेश्वराच्या आज्ञा मोडितां. तरी देखील तो तुमच्यावर दया करीत आहे. जर एखाद्या भिकाऱ्यास मोहरबानीनें तुम्ही प्रत्येक दिवशीं अन्नवस्त्र देतां व अनेक प्रकारें त्याचें बरें करितां आणि तोच जर तुमचा द्वेष करील अगर तुमची कांहीं चोरी करील अगर तुम्हांस शिवीगाळ करील अगर दुसऱ्या कोणत्या तऱ्हेनें तुमचें वाईट करील तर त्या अधमावर तुम्ही प्रीति कराल काय? तुम्ही त्यावर प्रीति तर करणार नाहींच पण उलटें त्या कृतघ्नास हांकलून लावाल व त्यास आपल्यासमोर येऊं देखील देणार नाहीं. आतां पहा माझी व तुमची स्थिति थेट या भिकाऱ्याच्या स्थितीसारखीच आहे. परमेश्वर तुम्हांवर दया करून रोज रोज तुम्हांस अन्नवस्त्र, मुलेंबाळें, व दुसरीं नाना प्रकारचीं सुखें देत आहे. आणि तुम्ही तर त्यास अडवितां व त्याचा द्वेष करितां. परमेश्वरास अडविणें अगर त्याचा द्वेष करणें हें आहे कीं तुम्ही त्याच्यावर प्रीति करीत नाहीं. त्यानें ज्या गोष्टा मना केल्या आहेत त्या तुम्ही करितां व ज्या गोष्टी त्यानें करावयास सांगितल्या आहेत त्या तुम्ही करीत नाहीं. त्याची आज्ञा आहे कीं केवळ एका निराकार परमेश्वराची भक्ति करावी. देव, देवी, व मूर्ति यांची पूजा करूं नये पण तुम्ही त्यांची पूजा करितां व परमेश्वराची भक्ति मुळींच करीत नाहीं. त्याची आज्ञा आहे कीं चोरी करूं नये, कोणास फसवूं नये. कोणास शिवीगाळ करूं नये, खोटें बोलूं नये, शिंदळकी व्यभिचार करूं नये. गर्व करूं नये. आपलाच स्वार्थ पाहूं नये. अशा आणखी पुष्कळ आज्ञा त्यानें दिल्या आहेत. त्या सर्व तुम्हांस ठाऊक आहेत. पण तुम्ही खऱ्या अंतःकरणानें त्यांपैकीं एक देखील आज्ञा पाळीत नाहीं. पण उलटें रात्रंदिवस त्यांचें उल्लंघन करितां. हें देवाला अडविणें व त्याचा द्वेष करणें नाहीं काय? तुम्ही नेहमीं सर्व गोष्टींत देवाला अडवितां व त्याचा द्वेष करितां यांत बिलकूल संशय नाहीं. परमेश्वर आमचा द्वेष करितो असें तर कोणी म्हणूं शकणार नाहीं. कारण त्याची प्रीति अनेक रीतींनीं दिसून येत आहे. तो सर्व जगावर प्रीति करतो. त्यानें जगावर मोठी प्रीति करून आपल्या एकुलत्या एक पुत्रास या जगांत पाठविलें. यासाठीं कीं पाप्यांस त्यांच्या पापापासून व नरकयातनेपासून सोडविण्याकरितां बहुत कष्ट व दुःखें सोसून त्यानें आपला जीव द्यावा व पाप्यांच्या पापाचें प्रायःश्चित करावें. परमेश्वराच्या अशा प्रकारच्या प्रीतीच्या ज्वालांकडून हीं तुमचीं अंतःकरणें मऊ होत नाहींत तर तीं कशाकडून होतील हें मला समजत नाहीं. जर अशा गोष्टींनीं तीं मऊ होत नाहींत तर दुसऱ्या कशानें होतील? जर तुम्ही देवाची प्रीति तुच्छ मानितां तर देवानें तुम्हांवर क्रोध करून घोर नरकांत टाकिलें असतां तें वाजवी होणार नाहीं काय ? खरोखर जर तुम्ही देवाच्या प्रीतीस आपल्या अंतःकरणांत जागा देणार नाहीं तर तो अवश्य असें करीलही.

## १२ येशू ख्रीस्ताची पाप्यांवर विलक्षण प्रीति.

तसेंच प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रीतिविषयींही विचार करा. जेव्हां परमेश्वरानें पाहिलें कीं जगांतले सर्व लोक पापामुळें भ्रष्ट झालेले आहेत व आपल्या आज्ञांप्रमाणें कोणी चालत नाहींत व आपली भक्ति करणें सोडून लोक आपल्या स्वतांच्या हातांनीं केलेल्या जड पदार्थांची पूजा करितात तेव्हां आपला न्याय व नेकी यांस अनुसरून तो त्यांस शिक्षा देण्यास सिद्ध होता. आतां ह्या गोष्टींत प्रभु येशू ख्रीस्ताची प्रीति पहा. जेव्हां त्यानें पाहिलें कीं जगांतले लोक शिक्षेस पात्र झालेले आहेत तेव्हां मध्यस्थ होऊन देव जो बाप त्यास त्यानें म्टलें कीं ‘बापा जगांतील लोकांनीं खरोखर पुष्कळ पापें केलीं आहेत व ते कडक शिक्षेस पात्र झाले आहेत. पण मजकडे पहा. मी त्यांचा जामीन होतो. मी जगांत जातो व मनुष्याची प्रकृति धारण करून त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा आपणांवर घेता. आणि मोठें दुःख व कष्ट सोसून व त्यांच्याबद्दल आपला जीव देऊन त्यांची खंडणी करितो. अशानें तुझा न्याय व नेकी हीं दोन्हींही पुरीं होतील. कारण कीं त्यांच्या पापाबद्दलची शिक्षा मजवर येईल. तसेंच तेणेंकरून तुझी दया व कृपा हींही स्पष्ट दिसून येतील. कारण कीं माझ्याद्वारें तूं त्यांची क्षमा व त्यांचें तारण करूं शकशील. मीं अशीं मोठीं दुःखें सोसल्याकडून व त्यांच्यासाठीं आपला जीव देण्याकडून मला जें पुण्य प्राप्त होईल त्याचें फल मी त्यांस देईन. माझ्या प्रायःश्चिताकडून स्वतां मला जो न्यायीपणाचा झगा प्राप्त होईल तो मी त्यांच्यावर घालीन. तेणेंकरून त्यांचा नागवेपणा झांकला जाऊन त्यांचें अपराध व त्यांचीं पापें तुझ्या दृष्टीस पडणार नाहींत. कारण कीं माझ्या पवित्रतेच्या व न्यायीपणाच्या झग्याकडून त्यांचे सर्व डाग व ठिपके झांकून टाकिले जातील. या रीतीनें ते तुझ्या दृष्टींत मान्य होतील. व माझ्यामुळें तूं त्यांस न्यायी असें लेखून आकाशांत घेऊं शकशील.’

प्रभु येशू ख्रीस्ताची ही गोष्ट देव जो बाप त्याच्या पसंतीस येऊन त्यानें म्हटलें, ‘तूं माझा प्रिय पुत्र आहेस तुझ्याविषयीं मी संतुष्ट आहें. त्वां माझ्या मनांतलीच गोष्ट सांगितली. तूं जगांत जाऊन मनुष्याची प्रकृति धारण करून त्वां म्हटल्याप्रमाणें पाप्यांचा तारणारा हो. जा व आपल्या पवित्रतेनें व न्यायीपणानें त्यांच्या पापाबद्दल क्षमा व त्याची खंडणी हीं साध्य करून घे. जो कोणी तुझ्या पुण्यावर व न्यायीपणावर आपल्या तारणाचा भरंवसा ठेवील त्यास तारण मिळेल.’

पहा, प्रभु येशू ख्रिस्त अवतार धारण करून या जगांत आला. चो आकाशांत होता तेव्हां सुखांत ल गौरवांत होता. पण त्यानें पाप्यांसाठीं स्वर्ग सोजिला व या जगांत येऊन गरीब व अप्रतिष्ठित असा झाला. व सर्व प्रकारचीं दुःखें व क्लेश सोसून आपला जीव अर्पण केला. हा मोठी विलक्षण प्रीति नाहीं काय? पहा तो स्वतः पवित्र व निर्दोष असतां त्यालें इतकीं दुःखें व वेदना सोशिल्या व लोकांचा द्वेष व वैर हीं सहन केलीं. त्यानें उलटून निंदा केली नाहीं. तो निर्दोष होता तरी त्यानें मार खाल्ला. तो चेंचरला गेला. त्याच्या मस्तकांनिंदा केली नाहीं. तो निर्दोष होता तरी त्यानें मार खाल्ला. तो चेंचरला गेला. त्याच्या मस्तकांत मोठेमोठे कांटे टोंचिले गेले. त्याच्या पाठीवर चाबुकांचे फटके बसले. त्याच्या हातांत व पायांत मोठमोठे खिळे ठोकिले. त्याचें शरीर रक्तबंबाळ झालें. त्याची प्रत्येक नाडी व शीर दुखावली गेली. शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें प्राण सोडिला. प्रभु येशू ख्रीस्तानें हें सर्व तुमच्या तारणाकरितां सोशिलें. तर हें मोठ्या अमर्याद प्रीतीचें लक्षण आहे कीं नाहीं हें सांगा.

## १३ येशू पवित्र व निष्पाप होता.

आणखी या गोष्टींचा नीट विचार करा कीं प्रभु येशू हा पवित्र व निष्पाप आहे. त्याच्या ठायीं पापाचा लेशही नाहीं. तर त्यानें जें दुःख व जे क्लेश सोशिलें तें सर्व दुसऱ्यांच्या बऱ्यासाठीं म्हणजे तुझ्या व माझ्या बऱ्यासाठीं

होतें तुम्हीं व मीं पाप केलें आहे. आपण पापामुळें परमेश्वराच्या क्रोधास पात्र झालों आहों. आपणांबद्दल व सर्व जगाबद्दल प्रभुनें हीं सर्व दुःखें व हे सर्व क्लेश सोशिले. मी पुन्हां विचारितों हीं मोठी विलक्षण प्रीति आहे कीं नाहीं? तिच्या चिंतनाकडून तुमची कठीण अंतःकरणें मऊ होत नाहींत काय? प्रीतिपासून प्रीति उत्पन्न होते. प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रीतिकडून तुमच्या अंतःकरणांत प्रीति उत्पन्न होणार नाहीं काय? तुमचीं अंतःकरणें इतकीं सुनबहिरीं झालीं आहेत काय कीं त्यांवर प्रीतीच्या गोष्टींचा कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं? किंवा तीं अशी नापीक जमीन झालीं आहे कीं तींत प्रीतीचें रोप उगवूं शकत नाहीं? अहो मित्रांनो तुम्हीं आपलीं अंतःकरणें किती काळपर्यंत कठीण कराल? तुमची स्थिति जर अशीच राहील तर पक्कें समजा कीं परमेश्वराचा क्रोध भडकून थोड्याच दिवसांत तुम्हांस गिळून टाकील.

## १४ येशू सर्व जगाचा तारणारा आहे ही मनुष्यांस मोठ्या आनंदाची वार्ता आहे.

तुम्ही खरोखर समजा कीं परम श्रेष्ठ परमेश्वरानें प्रभु येशू ख्रीस्तास एखाद्या आवडत्या राष्ट्राचा किंवा देशाचा तारणारा नेमिलें आहे असें नाहीं. तर सर्व जगाचा तारणारा नेमिलें आहे. म्हणून प्रभूनें आकाशांत चढून जाण्याच्या वेळीं आपल्या शिष्यांस आज्ञा केली कीं, 'सर्व जगांत जाऊन तारणाचें शुभवर्तमान सांगा.' त्याच्या आज्ञेस अनुसरून त्याचे प्रेषित देशोदेशीं फिरलें. बहुत लोकांनीं त्यांचा उपदेश ऐकून आपला खोटा धर्म सोडून दिला व प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेऊन ते त्याचे शिष्य झाले. त्या दिवसापासून आजपर्यंत या जगांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार होत आला आहे व अजूनही तो तसाच फैलावत आहे. या हिंदुस्थान देशांत ही देवाच्या मोठ्या कृपेनें मिशनरी लोक व त्यांचे अनुयायी ख्रीस्ती धर्माचा उपदेश करीत आहेत.

तसेंच मीही या लहानशा पुस्तकाच्याद्वारें तुम्हांस - जे कोणी हें पुस्तक वाचितील अगर ऐकतील त्यांस - तारणाचें शुभवर्तमान घोषण करीत आहे. मित्राच्या नात्यानें मी तुम्हांस सांगतों कीं, प्रभु येशू ख्रीस्त तुम्हां हिंदुलोकांचाही तारणारा आहे. त्याच्याशिवाय दुसरा तारणारा नाहीं.पाप्यांस जशा तारणाऱ्याची गरज आहे तशाच प्रकारचा तो आहे. तो पवित्र आहे. त्याच्याठायीं पापाचा लेशही नाहीं. तो सर्वशक्तिमान दयाळु व कृपाळु आहे. तो पापाचा शत्रू आहे पण पाप्यांचा मित्र आहे. सारांश जे जे गुण जगाच्या तारणाऱ्याच्या ठायीं असले पाहिजेत ते सर्व प्रभु येशू ख्रीस्ताच्या ठायीं आहेत. तो परमेश्वराचा खरा अवतार व जगाचा खरा गुरु आहे. जो कोणी शुद्ध अंतःकरणानें त्यास शरण येतो त्या प्रत्येकास तो तारणाचें ज्ञान व तारण हीं अवश्य देतों.

**दोहा.**

**सत्यगुरू माझा शूर । करी शब्दांचा व्रण ॥**
**मारी गोळा प्रेमाचा । भ्रम कोट उडवी क्षण ॥ १ ॥**

आतां तुम्हांस या गोष्टीचा काळजी पूर्वक विचार केला पाहिजे कीं, काय केल्यानें आपणांस हें मोलवान तारण मिळेल. पवित्र शास्त्रांत प्रभु येशू ख्रीस्तानें असें सांगितल्याचें लिहिलें आहे कीं जो कोणी त्यावर विश्वास ठेवील व बाप्तिस्मा घेईल त्याचें तारण होईल. पण जो कोणी विश्वास ठेवणार नाहीं त्यास शिक्षा देण्यांत येईल व त्यास नरकांत टाकिलें जाईल.

## १५ माझें तारण कसें होईल?

यावरून दिसून येतें कीं तारण मिळावें म्हणून तुम्हांस दोन गोष्टी केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही आहे कीं प्रभु येशू ख्रीस्तावर आपल्या तारणाचा विश्वास ठेवावा. दुसरी गोष्ट अशी आहे कीं बाप्तिस्मा घ्यावा.

प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवणें याचा अर्थ असा आहे कीं तुम्ही जर आपल्या पापाबद्दल खरे पश्चात्तापी होऊन तारण प्राप्त करून घेऊं इच्छितां तर आपल्या खोट्या धर्माचा त्याग करून आपलें पुण्य व आपलीं सत्कर्मे यांवरचा भरंवसा सोडून देऊन केवळ प्रभु येशू ख्रीस्तावर आपल्या तारणाचा भरंवसा ठेवावा आणि मनांत विश्वास धरावा कीं त्यानें जें पुण्य व जो न्यायीपणा मिळविला आहे त्यांकडून आमच्या पापांचें प्रायश्चित्त झालें आहे. तो आपला धनी, आपला गुरू, आपला राजा व आपला तारणारा आहे. तर आपण खऱ्या अर्थानें त्यास शरण जाऊन त्याचें शिष्य व्हावें.

## १६ बाप्तिस्मा म्हणजे काय?

तसेंच बाप्तिस्मा घेण्याचें कारण असें आहे. जेव्हां तुम्ही खऱ्या अंतःकरणानें प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून त्याचे शिष्य होऊं इच्छितां तेव्हां तुम्ही आपल्या अंतःकरणांतील विश्वास मनुष्यांसमोर अंगीकार करून प्रकट करून दाखवावा याचें अगत्य आहे. कदाचित् कोणी म्हणेल कीं दुसऱ्या कोणांस ठाऊक असो कीं नसो मी आपल्या अंतःकरणांत प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवितों. मग तो लोकांस कळविण्याची काय जरूरी आहे? याचें उत्तर असें आहे कीं अशा प्रकारचा विश्वास हा खरा विश्वास नव्हे. प्रभुनें बाप्तिस्मा एक संस्कार नेमिला आहे. तो संस्कार करून नव्या शिष्यास ख्रिस्ती मंडळींत घेतात. तो संस्कार शिष्यत्वाचा शिक्का असा आहे. त्या संस्काराचें वर्णन करण्याचें या ठिकाणीं प्रयोजन नाहीं. तो संस्कार घेतल्याकडून नवा शिष्य लोकांसमोर उघड कबूल करितों कीं मी आपला पूर्वींचा खोटा धर्म सोडून देतो, व प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याच्या धर्मांत येतों व त्याचा शिष्य होतो. मग तो संस्कार करण्याकडून तो ख्रिस्ती मंडळींत घेतला जातो.

## १७ परमेश्वर प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या अंतःकरणांत आपला पवित्र आत्मा पाठवितो.

तसेंच हेंही समजलें पाहिजे कीं परमेश्वर प्रत्येक खऱ्या ख्रिस्ती मनुष्याच्या अंतःकरणांत आपला पवित्र आत्मा पाठवितो व तो आत्मा त्यांच्या अंतःकरणांत वस्ती करितो. त्या आत्म्याच्या शिक्षणाकडून व काम करण्याकडून शिष्य प्रति दिवशीं देवाच्या ज्ञानांत व प्रीतींत वृद्धि पावत जातो आणि पापाचा द्वेष करून प्रत्येक चांगल्या कामांत वाढत जातो.

## १८ मी ख्रिस्ती झालों तर माझे जातभाऊ मला जाती बाहेर टाकितील.

या गोष्टी वाचून अगर ऐकून कदाचित् तुम्ही म्हणाल कीं जर आम्ही आपला हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूं तर आमच्या जातीचे लोक व भाऊबंद यांस तोंड द्यावें लागेल. कारण ते आम्हांस खचित जाती बाहेर टाकितील व आमचा द्वेष करितील. पण माझ्या मित्रांनो जर तुम्ही आपल्या आत्म्याचें तारण होऊं इच्छितां तर तुमचे भाऊबंद व जातीचे लोक काय म्हणतील अगर काय करितील याची पर्वा करूं नका. पण असा पक्का निस्चय करा कीं भाऊबंद कांहीं म्हणोत अगर कांहीं करोत आम्ही आपल्या आत्म्याच्या उद्धारासाठीं व स्वर्ग प्राप्तीसाठीं ख्रिस्ताचे शिष्य अवश्य होऊं. तुम्ही पक्कें जाणतां कीं तुम्ही कितीही खोटें बोलला, शिव्या गाळी केल्या, चोरी केली, व्यभिचार केला अगर दुसरें कोणतेंही वाईट काम केलें करी तुम्हांस कोणी जाती बाहेर टाकणार नाहीं. कारण कीं सर्व प्रकारचे दुराचारी व दुष्ट लोक तुमच्या जातींत राहूं शकतात. पण तुम्ही आपल्या तारणासाठीं व परलोकींच्या सुखासाठीं खोटेपण व दुष्टाई सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूं पाहतां तर लोक तुम्हांस जाती बाहेर टाकितात. अशा प्रकारच्या जातीस व भाऊबंदपणास हाय हाय! या गोष्टीचा विचार केला असतां मला म्हणणें भाग पडतें कीं प्रभु येशू ख्रीस्तामुळें ज्यांस जाती बाहेर व कुलाबाहेर केलें जातें व त्या कारणामुळेंच ज्यांचा पाठलाग होतो ते धन्य आहेत. कारण ते प्रभूच्या पवित्र लोकांत गणिले जातील. प्रभु येशूनें स्वतां म्हटलें आहे कीं -

**श्लोक**

**न्यायीपणासाठीं जयांस गांजिती ।**
**ते धन्य स्वर्गीं चिर राज्य पावती ॥ १ ॥**

## १९ जात व नातलग यांच्या अधिकारापेक्षां देवाचा अधिकार मोठा आहे.

आणखी हाही विचार करा कीं कोणाचें म्हणणें मोठें आहे. जात भाऊबंद यांचें कीं देवाचें? तुमचें मन तुम्हांस ग्वाही देतें कीं देवाचें म्हणणें मोठें आहे. तुम्ही मराल तेव्हां तुमचे भाऊबंद तुमच्या बरोबर येतील काय? कधींही येणार नाहींत. म्हणून जर तुम्ही खऱ्या अंतःकरणानें प्रभू येशूचे शिष्य होतां व त्यामुळें लोक जाती बाहेर व गोताबाहेर करितात व तुम्हांस शाप देतात तर त्याची पर्वा करूं नका. तुम्हांस दुःख व त्रास होईलच. पण तुम्हांस ठाऊक आहे कीं हें दुःख थोड्या दिवसांचें आहे. पण मरणानंतर तुम्हांस स्वर्गांत जागा मिळेल व तेथें तुम्ही सर्वकाळ सुखांत व आनंदांत रहाल. जर तुम्ही नातलगांच्या भयानें आपला विश्वास लपवून ठेवाल तर लोक तुमचा पाठलाग करणार नाहींत हें खरें, पण मरणानंतर न्यायाच्या दिवशीं परमेश्वर तुम्हांस विचारील कीं तुम्ही माझ्या वचनाचा अव्हेर कां केलांत? व आपल्या भाऊबंदाची गोष्ट, जी माझ्या वचनाच्या विरुद्ध होती ती कां मानिलीत? मी तुम्हांस आकाशांत रहाण्यास अयोग्य समजून नरकाच्या अग्नींत टाकितो. ‘अहो अन्याय करणाऱ्यांनो मजपासून पळा.’ त्या वेळीं नातलगांच्या संगती ऐवजीं भुतें व दुष्ट लोक यांच्या सहवासांत तुम्हांस अक्षय काळपर्यंत नरकांत रडत व दुःख करीत रहावें लागेल.

## २० या जगांत येशू हाच तारणारा असून परलोकीं तोच न्याय करणारा आहे.

आतां माझ्या हिंदु मित्रांनो, मी तुम्हांस विनंति करितों कीं तुम्ही आपला तारणारा प्रभु येशू ख्रीस्त याचा खऱ्या अंतःकरणानें अंगीकार करा. प्रभु येशू ख्रीस्ताचें नांव गाजविल्यानें मी देवास एकीकडे ठेवीत आहे असेंही अगदीं समजूं नका. असें मुळींच नाहीं. परमेश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता व प्रभु आहे. परंतु मी तुम्हांस सांगतों कीं परमेश्वर न्यायी व पवित्र आहे. मी तुम्ही व जगांतले सर्व लोक पाप केल्यामुळें अपवित्र व भ्रष्ट झालों आहों. व म्हणून परमेश्वरापासून दूर केलेले असें झालों आहों. कारण कीं परमेश्वर पापाचा वीट मानितो. यास्तव परमेश्वराचा पुत्र प्रभु येशू ख्रीस्त हा मध्यस्थ होऊन समेट करण्याकरितां या जगांत आला. तो आपल्या लोकांच्या पापांचें ओझें आपणा स्वतांवर घेऊन आणि आपल्या न्यायीपणाचें फळ त्यांस देऊन त्यांचा देवाशीं समेट करितो व त्यांस स्वर्गाच्या मार्गानें नेतो. अशी गोष्ट दुसरा कोणी देव अगर मनुष्य करूं शकत नाहीं. कारण कीं ते स्वतां पापी व दुर्बल आहेत. तर ते मध्यस्थ कसे होऊं शकतील? प्रभु येशू ख्रीस्ताच्या वचनाचा धिःकार करूं नका. त्याचा धिःकार करणें हें तारणाऱ्याचा धिःकार करणें असें आहे. आणि तारणाऱ्यावांचून तुमचें तारण कसें होईल? जर कोणी वैद्य आपणाबरोबर औषध घेऊन सर्व भाजारभर फिरेल व मोठ्या शब्दांनीं ओरडेल कीं ‘अहो सर्व दुखणाइतांनो मजपाशीं या. जें घेण्याकडून तुम्ही अगदीं निरोगी व्हाल अशा कांहीं प्रकारचें औषध मी तुम्हांस फुकट देईन.’ तर बहुत आजारी लोक आनंदानें त्याजकडे जातील व त्याचें औषध घेऊन आपला फायदा करून घेतील. पण जर कोणी आजारी मनुष्य मूर्खपणानें अगर गर्वानें त्याजकडे जाणार नाहीं तर तो दोष त्याचा आहे. आणि त्या दोषाबद्दलचें फळ त्यास भोगावें लागेल. म्हणजे तो तसाच दुखण्यांत पिचत पडून राहील व बरा होणार नाहीं. याप्रमाणेंच प्रभु येशू ख्रीस्त हा आत्म्याच्या रोगाचा वैद्य आहे. तो सांगत आहे कीं ‘अहो सर्व लोकांनो जे तुम्ही तारणाच्या उपायाचा शोध करितां करितां थकून गेला आहां ते सर्व तुम्ही मजकडे या म्हणजे मी तुम्हांस विसांवा देईन.’ तर तुम्ही त्याजपाशीं कां जात नाहीं? नरकाच्या वाटेनें कां जातां? जर कोणी मनुष्य दुर्दैवानें आपली मालमत्ता गमावील तर मेहनत व उद्योग करून हळूहळू पुन्हां कांहीं तरी मिळवूं शकेल. परंतु येशू ख्रीस्ताचा अव्हेर करून जो एकदां आपल्या जीवाची हानी पावला त्याची ती हानी पुन्हां कधींही भरून येणार नाहीं.

आणखी एक गोष्ट ऐका. प्रभु येशू ख्रीस्त जो एकदां पाप्यांचें तारण करण्याकरितां अवतार घेऊन गरीबीनें व नम्रतेनें या जगांत आला होता तो हल्लीं उंचावलेला होऊन आकाशाच्या सिंहासनावर बसलेला आहे. तोच येशू जगाच्या शेवटीं पुन्हां येईल परंतु पहिल्या वेळीं जसा तो गरीबीनें आला तसा येणार नाहीं. पण मोठ्या गौरवानें व वैभवानें येईल. तो त्यावेळीं सर्व नीतीमानांस आपल्याजवळ बसवील व ते त्याजसंगतीं सर्वकाळ सुखांत व आनंदांत रहातील. तसेंच तो दुष्टांचाही न्याय करील. त्यावेळीं तो प्रत्येक अभक्त व दुष्ट मनुष्यापासून, त्याच्या सर्व पापांबद्दल - मग तीं कोणत्याहीं तऱ्हेनें केलेलीं असोत - हिशोब घेईल आणि त्यांस नरकांत टाकील.

आतां विचार करा. नरक म्हणजे देवानें आपल्या शत्रूंसाठीं तयार केलेली भयंकर दुःखाची जागा आहे. जे कोणी त्या जागेंत टाकिले जातील ते रडत व दांत खात अग्नि व गंधक यांच्या सरोवरांत युगानुयुग तळमळत राहतील.

## २१ दुष्टांचा परिणाम जो नरकदंड त्यापासून सुटका.

पवित्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं, ‘परंतु भेंकड व अविश्वासी व ओंगळ व घातक व व्यभिचारी व चेटकी व मूर्तिपूजक व सर्व लबाड यांचा भाग, जें सरोवर अग्नीनें व गंधकानें जळतें त्यांत होईल.’ या गोष्टीविषयीं विचार करा व भयभीत व्हा. तारणाचा शोध करणाऱ्या प्रत्येकासाठीं परमेश्वराच्या दयेचा दरवाजा आतां खुला आहे. पण जर तुम्ही या जगांत त्याच्या दयेचा व कृपेचा धिःकार कराल तर शेवटल्या दिवशीं तुम्हांवर त्याचा राग कोसळेल. प्रभु येशू ख्रीस्ताची प्रीति व तारण यांस आतां जर तुम्ही तुच्छ मानितां तर परलोकीं तुमचा उद्धार होण्याची आशा नाहीं. अहो मित्रांनो जोंपर्यंत तुम्ही जीवंत आहां तोंपर्यंत तुम्हांस आशा आहे. पण मरण समयीं आत्मा शरीरापासून वेगळा होईल. तेव्हां वेळ निघून जाईल व तुमची तारणाची आशा समूळ नाहींशी होईल. यायाठीं मी तुमची विनंति करितों कीं, अहो सर्व लोकांनो जे तुम्ही पापाखालीं दबून गेले आहां ते सर्व तुम्ही आपल्या आत्म्याच्या उद्धाराचा अगत्यपूर्वक ताबडतोब शोध करूं लागा. प्रभु येशू ख्रीस्तानें तुमच्या पापांची क्षमा करावी व परलोकीं तुमचें पूर्ण कल्याण व्हावें म्हणून तुम्ही लवकर प्रभु येशू ख्रीस्ताचे शिष्य व्हा.

**इति धर्मतुला समाप्त.**

------------